# दुसरे प्रकरण

## ‘उपेक्षितांचे अंतरंग’ -रसग्रहण

# 'उपेक्षितांचे अंतरंग' -रसग्रहण

या प्रकरणात 'उपेक्षितांचे अंतरंग' या कथासंग्रहातील कथांचे क्रमवार रसग्रहण केले आहे.

## १.बन्सीधर ! तू आता कुठे रे जाशील ?

ही एक व्यक्तिप्रधान कथा आहे.

### कथानक-

सातारा जिल्ह्यातील लेंगरे या गावी कातकऱ्यांच्या तळावर या कथेची सुरूवात होते. दहा बारा झोपड्या, आसपास फिरणारी कुत्री, गाढवे यावरून समजते की ही वस्ती दारिद्र्याने गांजलेली होती. झोपडीच्या आसपास मुले गोंगाट करीत होती.

बंछी हा त्यापैकीच दहाबारा वर्षाचा दिसायला सुकुमार असा मुलगा होता. इतर मुलांचे घरटी पाडणे, पिलांची अंडी पाडणे हे उद्योग त्याला मनोमन बरे वाटत नसत. सर्व मुलांचा त्याच्यावर जीव होता.

बेम्ट्याच्या बापाचे नाव चिम्या. सर्व वस्तीवर याचा वचक होता. हा आडदांड पुंड महातामसी होता. बन्सीवर याचा जीव होता. त्याने त्याच्या अंगाला कधी बोट लावले नाही. त्याच्या बायकोचे नाव तुळशी. ती देखील त्याच्यावर पुत्रवत प्रेम करते. या चुकल्या वासरावर तिचे भारीच प्रेम होते. ''कारबारनी, जरीमरीनं तडाका दिला, प्वारं पटापट मेली. येताळ जरीमरी आता जरा निवल्यावानी झाल्याती ह्ये बग, या द्येव मानसाला नीट्ट सांबाळ; अग ह्यो द्येवाचा बाळ हाइ; ह्येला घव्हाचा तुकडा घाल, मास्कांड घालू नग.'' [१] अशी त्याची बन्सीबद्दल भावना होती. ते त्याला देव माणूस समजत. पण बन्सी त्या वातावरणात सुकत चालला होता.

काही भिकारी कातकऱ्यांच्या तळावर भिकेस आले. 'उलट उलट माघारा प्राण्या का गोते खाशी' असे इशारतीचे व 'बिकटवाटं' असे चालीचे पद म्हणताच बन्सीचे चित्त गलबलून गेले. धाक्या, पवळ्या रात्र होताच झोपी गेले. पुरूष मंडळी रात्री दोन नंतर येऊन झोपली. सगळीकडे निजानीज झाली. सकाळी उठून पाहतात तो बन्सी अंथरूणावर नाही.

नऊच्या सुमारास सकाळी जयपाळ बाजारातून आला. त्याच्याजवळील भाजीच्या पेंडीतील

एक खाली पडलेली पेंडी बारा तेरा वर्षाच्या मुलाने उचलून दिली. जयपाळने त्याला ओळखले नाही. पण 'बाबा मी तुमचाच' म्हणून बन्सीने बापाच्या कमरेला मिठी मारली. बापाला आपला मुलगा भेटला. त्याच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले. घरी गेल्यावर माजघरातून येणारी आपली आई असेल असे त्याला वाटले. पण पुढे येणारी आपली आई नाही हे त्याच्या लक्षात आले. बन्सीची आई काळसर, नाका डोळ्यांनी तरतरीत व सडपातळ होती. इथे आपल्या आईची कमतरता आहे असे त्याला वाटू लागले.

बापाने बन्सीसाठी सर्व केले. आपल्या मुलाला कोणत्या लोकात दिवस घालवावे लागले याचे त्याला वाईट वाटले. जयपाळ व मंगलादेवीच्या रात्रीच्या बोलण्यावरून आईच्या हाताला धरून जत्रेत जाता जाता आपल हरवलो हे त्याच्या लक्षात आले. पोर चुकले म्हणून जयपाळने म्हणजे बापाने तिला घराबाहेर घालवून दिले होते. आता ती कलेढोणला असते. हे त्याला समजताच बाबा आपल्याला भेटले पण आई भेटली नाही याचे वाईट वाटून तो रडू लागला. बापाच्या पोटाशी असताना देखील गोड घासही त्याच्या तोंडात घोळू लागे. एके दिवशी सकाळी बन्सी घरातून निघून गेला.

कलेढोण गावी ओढ्यावर धुण्याला आलेल्या बायका आपापसात मोकळेपणाने बोलत होत्या. मधूनच विश्रांती घेऊन गप्पा रंगवीत. त्यांचे एका कुटुंबासंबंधी बोलणे सुरू होते. नवरा बायको आहेत असे सांगतात. पण या बायांना त्या विषयी संशय आहे. पलीकडच्या खडकापाशी हीच स्त्री पिण्यासाठी पाणी भरीत आहे. तिने स्वच्छ पाण्याने घागर भरली. मुलानेही त्याच ठिकाणी स्नान उरकले व पाण्याची घागर व धुण्याचे पिळे घेऊन जाणाऱ्या स्त्रीच्या मागून तो जाऊ लागला. चमलदेवीच्या खांद्यावरचा पिळा जाता जाता पडतो. तो पोराने उचलून देताच गालावरचे ल्हासे, तेज:पुंज डोळे, गोजिरवाणी हनुवटी असणारा हा आपला मुलगा बन्सी आहे हे तिने ओळखले. आपल्या परागंदा झालेल्या मुलाला तिने जवळ घेतले. मायलेकरे दु:खाने व्याप्त पण आनंदाने तृप्त झाली. तिने त्याला घरी नेले व मालपुवा खायला दिला.

बन्सीने सांगोल्याला घडलेली सर्व हकीकत तिला सांगितली. साडेपाचच्या दरम्यान मोहनलाल घरी आला. त्याने तिला तेथूनच खुणावले. त्या दोघांचे काहीतरी बोलणे होऊन तो पुष्कळ रात्र झाल्यावर घरी आला. चमेली त्याला जवळ घेऊन झोपी गेली. मध्यरात्री पलीकडच्या खोलीत चमेली व मोहनलालचे बोलणे त्याने ऐकले. त्याला सर्व कळून चुकले. चमेलीने सकाळी उठून त्याला पाणी दिले. त्याचा बिछाना गोळा केला. हे त्याला कसेसेच वाटले. आईने बन्सीला जवळ घेतले. पण घेताना त्याच्या अंगाची ओढ लांब सरण्याची आहे हे तिच्या ध्यानी आले. आपली आई जेवत नाही, तिला ओकाऱ्या येतात हे पाहताच गोड घास त्याच्या तोंडात घोळू लागला. आसपासची माणसे घरी येत नाहीत पण कुचकुच करतात हे त्याच्या

लक्षात येऊन चुकते. पंधरा दिवस कसाबसा तो राहतो. एके दिवशी पाहतात तो बन्सी घरात नाही.

लेंगऱ्याच्या ओढ्याकडे त्याने पुन्हा धाव घेतली. तो झोपड्या विस्कटलेल्या होत्या. कातकऱ्यांचा तळ विस्कटलेला होता. सर्वांच्या हातात बेड्या व पायात दंडाबेड्या होत्या बन्सी घाबरला. बायकापोरे सामान सुमान एकीकडे व पुरूष गडी एकीकडे अशी विभागणी झाली. देव तुजा सांभाळ करील, तू देवाचा लेक आहेस हे चिम्याने त्याला पुन्हा सांगितले. शिपायांनी बन्सीला हाकलून दिले तरी चिम्या त्याच्याकडे वळून पहातच होता. या नंतरचे बन्सीच्या मनस्थितीचे वर्णन माटयांच्याच शब्दांत.

'संध्याकाळ होत आली आहे; बन्सी दमून भागून ओढ्याच्या काठी बसला आहे; त्याचा बाप जयपाळ मंगलदेवीच्या संगतीत आपल्या घरी आहे; त्याची आई मोहनच्या संगतीत आपल्या घरी आहे. पोरका पोरका बन्सी ओढ्याच्या काठी बसला आहे. त्याची आई-तुळशीआई धरून नेलीली आहे. त्याचा बाप चिम्या जेलखान्याकडे चाललेला आहे. त्याच्यावर प्राणाप्रमाणे प्रेम करणारी त्याची भावंडे बेम्ट्या-पवळ्या पुण्याच्या पोरसुधारक संस्थेकडे चालली आहेत, पोरका-टोरका बन्सी ओढ्याच्या काठी बसला आहे. एक लांबोळे, चोपलेले रोडके कुत्रे त्याच्या शेजारी दोन पाय पसरून दीनवाणेपणाने त्याच्या तोंडाकड पहात बसले आहे. माझ्या गोड बन्सीधरा ! तू आता कुठे रे जाशील ?'

## व्यक्तिचित्रे-

**बन्सी-** हे या कथेतले प्रमुख पात्र आहे. त्याच्या भोवतीच सर्व कथा वेगवेगळ्या अंगांनी वळविली आहे. कातकऱ्यांच्या तळावर राहणारा हा पोर वृत्तीने सात्विक आहे. त्याला कथेत तळावर मिळणारी वागणूक ही देवाचा पोर अशी आहे. बन्सी कसा होता हे माटयांच्या शब्दांत सांगता येईल.

'बंछी सुमारे बारा वर्षांचा असावा. उन्हाने आणि उघड्यावरच्या वापराने त्याचा चेहरा रापला असला तरी तो लालवट गोरा होता; नाक काहीसे लांब असून, कपाळातून निघताच उचललेले असल्यामुळे, त्याचा रूंदट चेहरा सुशोभित दिसे; बंछीचे डोळे घारे-बदामी रंगाचे असून, उन्हाच्या तिरपीने त्यांत तांबड्या रेषा उमटलेल्या होत्या; त्याच्या डाव्या गालावर लहानसे निळसर ल्हासे असून ओठ सारखे मिटून धरण्याची त्याला सवय होती; गेल्या दोन वर्षांपासून त्याच्या हनुवटीवर एक लांबच्या लांब वण पडला होता; जसा काही काटेऱ्याने निघालेला खोल ओरखडा भरून निघाला आहे; मांडीपासून त्याच्या पायाचा घाट व पावलांचा मलिन सुकुमारपणा

शहरात शाळेत जाणाऱ्या मुलालाच शोभला असता.' [३]

बन्सी हा कोवळा पोर आई वडिलांच्या प्रेमासाठी आसूसला होता. हे प्रेम त्याला कातकऱ्यांच्या तळावर काही प्रमाणात का असेना मिळाले. चिम्या, एक आडदांड महातामसी माणूस, पण तो त्याला देवाचा पोर समजतो. स्वत:च्या पोरासारखेच चिम्या त्याच्यावर प्रेम करतो. या चुकल्या वासरावर तुळशीआईचेही तितकेच प्रेम आहे. त्याला मास्कांड खायला देण्याऐवजी ह्या देवाच्या पोराला ते गव्हाचा तुकडा खायला देतात. चिम्या ह्या देवाच्या पोराच्या रोज पाया पडत असे. एकूणच त्याला तळावर मिळणारी वागणूक ही प्रेमळ होती. पण त्याच्या चित्ताला एक निराळीच ओढ होती.

बन्सीचा बाप जयपाळ त्याला भेटतो. बन्सी व जयपाळ ही पिता पुत्रांची भेट माट्यांनी इतक्या चांगल्या पध्दतीने रेखाटली आहे की तिथले वात्सल्य मनात घर करून राहते. ही भेट संवाद व वर्णनाच्या आधारे सांगितली आहे. वात्सल्याने न्हाऊन निघालेली ही भेट आहे. पण तिथं त्याची आई त्याला भेटत नाही. तो स्वत: आपल्या बापाला ओळखतो. पण त्याचा बाप त्याला ओळखू शेकत नाही. वास्तविक बापाने त्याला ओळखायला हवे पण इथे उलट घडते. वात्सल्ययुक्त भेटीचा बन्सीचा आनंद फार काळ टिकत नाही. जयपाळच्या घरात असणारी स्त्री ही आपली आई नाही हे त्याच्या लक्षात येते. बाप भेटला खरा पण बाप आणि आई दोन्ही त्याला हवे होते. जयपाळच्या घरी मिळणारा गोड घास त्याच्या तोंडात घोळू लागतो. तो भिंतीकडे तोंड करून बसू लागतो. आपण एकाकी आहोत ही त्याची जाणीव अधिक गहिरी होते. आई भेटत नाही. म्हणून तो ते घर सोडून आईकडे जातो. तिथे त्याची आई मोहनलाल नावाच्या वेगळ्याच माणसाबरोबर नवऱ्याप्रमाणे राहते. हे त्याला सहन होत नाही. आईकडून त्याची अपेक्षा वेगळी आहे. सांगोल्याला घडलेली हकीकत तो तिला सांगतो. या ठिकाणी काही आगळिक नसेल अशीच त्याची अपेक्षा आहे. त्याचा अपेक्षाभंग होतो. आईने त्याला जवळ घेतले पण त्याच्या अंगाची ओढ लांब सरण्याची होती. आईकडे तो आशाळभूतपणे पाही, खाली पाही व रडू लागे.

बन्सीला घर हवे आहे. त्या घरात त्याला आई आणि वडिल दोघेही हवे आहेत. ही त्याची इच्छा अतृप्त राहते. त्याच्या मनात जी पोकळी निर्माण होते ती जीवघेणी आहे. तो कमालीचा अस्वस्थ होतो. पुन्हा तो लेंगऱ्याच्या माळावर परत येतो. या ठिकाणी त्याच्या दैवदुर्विलासाचे वर्तुळ पूर्ण होते. तिथे तुळसाआईलाही धरून नेलेले असते. ही सर्व दृश्ये बघून तो आक्रोश करू लागतो. तो आपल्या भावना कुठेच व्यक्त करू शकत नाही. त्याची घुसमट होते. बन्सीचा निर्व्याजपणा, त्याची निरागसता, पोरकेपणा रंगविणे हा श्री.म.माटे यांचा प्रधान हेतू आहे. एका

दहा बारा वर्षांच्या कळत्या मुलाची होणारी फरपट माट्यांनी रेखीवपणे चित्रीत केली आहे. तसे अल्पवय असले तरी बन्सीला सर्व भावनिक ताण समजतात. कोवळ्या वयातच त्याला अकाली प्रौढत्व आले आहे. माझ्या गोड बन्सीधरा ! तू आता कुठे रे जाशील? असा प्रश्न करून लेखकाने बन्सीचे भावजीवन अधिकच कातर करून सोडले आहे. बन्सी आपल्या नजरेसमोर आल्याशिवाय रहात नाही.

प्रत्यक्षात आई बाप आहेत पण कुटुंबसंस्थेत आवश्यक असणारे आई बापाचे प्रेम मुलाला मिळत नाही. बन्सी पोरका होतो. वयाच्या मानाने तो समजुतदार आहे. आई वडिल दोहोच्या घरची त्याला दिसणारी व त्याचा अपेक्षाभंग करून अधिकच एककी करणारी परिस्थिती त्याच्या चटकन लक्षात येते. केवळ खायला मिहणारा गोड घास एवढीच त्याची अपेक्षा नाही. आई वडिलांचे प्रेम मिळण्यापेक्षा दोन्ही घरातील वातावरणामुळे बन्सी अधिकच निराश व उद्विग्न होतो.

**चिम्या-** चिम्या हे या कथेतील दुसरे पात्र. हा आडदांड पुंड महातामसी आहे. चार पाच ओळीतच माट्यांनी ही व्यक्तिरेखा जिवंत केली आहे. वृत्तीने भाविक असणारा चिम्या प्रेमळ आहे. बन्सीला पाहताच तो गहिवरतो. देवाचा पोर म्हणून त्याचा सांभाळ करतो. बन्सीला तो देत असलेल्या वागणूकीमुळे बन्सीबद्दल वाचकांच्या मनात सहानुभूती निर्माण होते. आई बापा वेगळ्या मुलाचा सांभाळ तो अतिशय चांगल्या रीतीने करतो.

मोहनलाल, जयपाळ, तुळशी ही इतर पात्रे या कथेत येतात.

## वातावरण-

भटक्या विमुक्त अशा जमातींचे तळ अन् त्यांची तळावरील वस्ती ह्या वातावरणात ही कथा प्रारंभी साकार होताना दिसते. या तळावर दारिद्र्य आहे. ओंगळवाणेपणा आहे. दहा बारा गाढवे, जवळच चरणाऱ्या कोंबड्या, लांडग्यासारखी दिसणारी, वाळकी चोपलेली कुत्री या सर्व वर्णनावरून या तळावरच्या स्थितीशील वातावरणाची साक्ष पटते. दारिद्र्य इथल्या माणसांच्या पाचवीला पूजलेले असले तरी माणूसकीला ही माणसे पारखी झालेली नाहीत.

पुढे बन्सीच्या बापाच्या घरातले वातावरण तसे सुखवस्तू आहे. या लोकांच्या गरजा फारशी ताणाताण न करता भागतात पण तरीही ही माणसे कौटुंबिकदृष्ट्या समाजमान्य नातेसंबंधांची नसल्याने गोड धोड खायला असणाऱ्या घरी ही बन्सी, प्रेमासाठी आसूसलेला पोर दु:खी आहे. कलेढोण या बन्सीच्या आईच्या घरातही चैन आहे, विलास आहे. बन्सीच्या आईचे आतडेही

बन्सीसाठी तुटते. पण या आपुलकीच्या आड मोहनलाल येतो. प्रेम व वात्सल्य यासाठी तगमगणाऱ्या बन्सीला हे वातावरण कुबट वाटते. या उलट आपले वडिल हे आपल्या आईचा दुस्वास करतात हे त्याच्या लक्षात येते. 'बन्सीच्या चित्ताचा कांदा उन्मळून बाहेर आला' अशा समर्पक शब्दयोजनेमुळे तिथल्या वातावरणाला गहिरेपणा येतो.

आपल्या भावभावना व्यक्त करायला महिलांना पाणवठा हेच योग्य ठिकाण वाटते. धोतर, लुगड्यांना तडाखे देत या बाया सुखदु:खाच्या गोष्टी बोलतात.

झोपडपट्टीतील आज इथं तर उद्या तिथं असे जीवन असणाऱ्या लोकांचे जीवन या कथेत बन्सीधराच्या भावभावनांबरोबर चितारले आहे.

## भाषाशैली-

माट्यांनी या कथेत प्रादेशिक शब्द वापरले आहेत. त्यामुळे या प्रदेशासह तिथले जीवनमान आपल्या लक्षात येते. उदा. गाढवे दिडक्या पायावर उभी होती, म्हशीसमोरचे हिरवे बाटूक, लांबोळी कुत्री, पोरांचा चिघोर ही विशेषणे प्रादेशिक आहेत.

तसेच बेम्ट्या, तवळ्या, धाक्या, चिम्या ही नावेदेखील खास कातकरी लोकवस्तीतील आहेत. माटे कातकऱ्यांच्या तळाचे वर्णन हुबेहुब करतात. तळाचे वर्णन वाचून चित्र काढता येईल. ही माट्यांची चित्रदर्शी शैली होय. कथेच्या प्रारंभाप्रमाणे कथेचा शेवटही चित्रदर्शी आहे. त्यात प्रादेशिकता जपलेली आहे. हे लोक वेताळ, जरीमरी या देवतांना भजतात. एकूण लेखनात माटे तपशील अगदी प्रादेशिक भाषेत भरतात. त्यामुळे प्रसंग डोळ्यासमोर उभा राहतो.

## संवाद:-

बंछी म्हणाला, ''ए पवळ्या, ए बेम्ट्या, अरे कुठं चालला? अरे तुळशीआई कुठं आहे?''

मागे वळून आक्रंदून ती म्हणाली, ''तिला बी धरलीया.''

''आई, आई, ए तुळशीआई, ए तुळशीआई !''बन्सी अगदी जीव पिळवटून ओरडला. ४
या संवादातून आईच्या प्रेमासाठी तडफडणाऱ्या बन्सीचे मत व्यक्त होते.

''कुणाचं प्वार अन् कुठं पडलंया ! कारबारनी ! ह्येला नीट संभाळ. आपून काइ पातक केलं ! महादेवाच्या डोंगरात वांदरं मारून खाल्ली; कार रं नशिबा ! पोरं पटापट मराई लागली. रायाची वांदरं मारून खाल्ली !'' असं म्हणून चिम्याने कपाळ बडवून घेतले. ५

ह्या संवादातून कातकरी जीवनाच्या स्थितीचे चित्रण तर होतेच. पण ह्या माणसाच्या देवदेवता

कोणत्या होत्या, त्यांचा दैववादावर हवाला कसा आहे हे लक्षात येते. तीन ओळींचा संवाद बरेच काही सांगून जातो.

## रचनातंत्रः-

एका दैनिकातील वृत्त वाचून श्री.म.माटे यांनी ही कथा लिहिली आहे. पुण्यातील नारायण पेठेतून एक मुलगा काही भटक्या लोकांनी पळवून नेला होता व सुमारे दीड दोन वर्षांनी जळगावच्या आसपास त्याने आपली सुटका करून घेतली आणि तो आपल्या आई बापांकडे आला, हे वृत्त म्हणजेच या कथेचे छोटेसे बीज. बन्सी भोवती कथा फिरती ठेवण्यात श्री.म.माटे कमालीचे यशस्वी झाले आहेत. अत्यंत सूचक शब्दांत व कमीत कमी वाक्यात मोहनलाल व मंगलादेवीच्या मनातील बन्सीविषयीचा भाव लेखक व्यक्त करतो. बन्सीवर त्याचा काय परिणाम झाला याचा विचार करण्याचे काम लेखकाने वाचकांवर सोपविले आहे. लेखक केवळ बन्सीच्या कृती चित्रीत करीत जातो. शेवटी बन्सीधर आपोआपच पोरका ठरतो.

कथेचे वेगळेपण भाग करून माट्यांनी ही कथा खुलविली आहे. सजवली आहे. लेंगऱ्याच्या माळावरील चिम्या व तुळशी, सांगोल्यातील जयपाळ व मंगलादेवी, कलेढोण मधील मोहन व चमेली या जोडप्यांच्या जीवनात बन्सीचे असलेले स्थान लेखकाने मार्मिक व कल्पक रीतीने व्यक्त केले आहे. खऱ्या वडिलांच्या ठिकाणी, आईच्या ठिकाणी बन्सी अस्वस्थ आहे. लेंगऱ्याच्या माळावर तो आनंदी आहे. यातील विरोधाभास वाचकांच्या मनाला चटका लावून जातो. कथेत वात्सल्य व कारूण्य या भावनांची केलेली गुंफण वाचकाचे मन हेलावून सोडते. वृत्तपत्रात आलेल्या एका बातमीच्या बीजाचे कथेच्या वटवृक्षात रूपांतर करण्याची किमया माट्यांच्या लेखणीला कुशलपणे साधली आहे. कथेच्या प्रारंभाप्रमाणे शेवट देखील चित्रदर्शी आहे. सुरवातीला लेंगऱ्याच्या वस्तीचे जीवन गजबजलेले आहे. तर दुसरे विखुरलेल्या वस्तीचे. बन्सीचे जीवन त्याबरोबरच विस्कटते. तुकड्यातुकडयांनी एखाद्या चलतचित्रासारखी ही कथा आपल्या डोळ्यासमोर येते. वेगवेगळ्या घटना वेगवेगळ्या ठिकाणी घडतात पण बन्सी या एकाच पात्राच्याद्वारे त्या सर्व जोडून कथेची रचना केली आहे.

'एक लांबोळे, चोपलेले रोडके कुत्रे त्याच्या शेजारी दोन पाय पसरून दीनवाणेपणाने त्याच्या तोंडाकडे पहात बसले आहे. माझ्या गोड बन्सीधरा ! तू आता कुठे रे जाशील?' [२] या वाक्यात कारूण्याची डूब आहे. बन्सीविषयी वाचकाच्या मनात प्रेमभाव आपुलकी निर्माण होते. पोरका बन्सी भविष्यकाळात कुठे जाणार याचा वाचक अंतर्मुख होऊन विचार करतो. हेच या कथेचे यश आहे.

# २.कृष्णाकाठचा रामवंशी

## कथानक-

डोंगराच्या घळीत सत्या बसला आहे. त्याच्या जीवाला जीव देणारी फरशी शेजारी आहे. दिसायला सत्या राकट, खांद्यावर काळीभोर घोंगडी अन् भरदार छाती आहे. त्याची छाती म्हणजे शौर्य अन् साहस यांचे वस्तीस्थान आहे. तो कसा आहे ''मनगटासारख्या त्याच्या त्या जाड मिशा झुबकेदार असूनही आखल्यासारख्या दिसत. तिरप्या रोखाने वाढत जाऊन आणि वाटेत भेटणारे गालांवरचे केस सामील करून घेऊन त्या त्याच्या कानांपर्यंत जाऊन पोहचल्या होत्या. डाव्या कानातील चोभ्यातून लोंबणारा त्याचा घेरदार बाळा कोणत्याही मानी स्त्रीने आपल्या नथेचा गाडा म्हणून योजिला असता. पलिकडे त्याचा जोडा, एक सरळ आणि एक कलावर असा पडला होता. त्या जोड्याच्या एकेका तडाख्याने सत्याने कैकांस पाणी मागू दिले नव्हते.''[५]

नरसू, पांड्या, यल्या हे त्याचे साथीदार होते. लहानमोठ्या कोणत्याही कामाला ते सत्याला मदत करतात.

अमावस्येच्या किर्रर रात्री इंदापूरकरांच्या घरावर दरोडा पडतो. सगळीकडे सामसूम झाल्यावर घरावर दगड यायला लागल्यावर लोकांची पाचवर धारण बसते. सावित्री नावाची स्त्री त्यांना सामोरी येते. पण घरी एखादा पाहुणा आल्यावर आपण जसे स्वागत करतो अगदी तसेच ती दरोडेखोरांचे देखील स्वागत करते. आलेल्या दरोडेखोरांना पाहुणे समजून त्यांना दूधभात जेवायला घालते. नंतरच दागिन्यांचा डबा त्यांच्या हवाली करते. झाल्या प्रकाराने सत्या व त्याचे साथीदार पालटतात. सत्या सावित्रीला दंडवत घालून आपली बहिण मानतो.

शाळेत शाळेचे काम मास्तरांच्यासह आळसावते. तोच शाळेच्या आवारात गडबड उडाली. सत्या आला, सत्या आला अशी आवई उठली. आला म्हणेपर्यंत सत्याचा शाळेत प्रवेश होतो. सत्या उग्र असला तरी प्रेमळ आहे. सत्या दरोडेखोर असला तरी तो शाळेत दरोडा घालण्यासाठी आला नसून मुलांना मिठाई वाटण्यासाठी आला आहे. मिठाई मिळताच मुले आनंदित होतात. ज्याच्याकडून मिठाई आणली त्या गणू हलवायाच्या हातात शंभर रूपये पडताच तोही आनंदून जातो.

पुढचा प्रसंग बाजारातला आहे. बाजारच्या दिवशी तुरडाळ, हरभरा डाळ हे धान्य जरी विक्रीस आले तरी मुख्य बाजार जोंधळ्याचा होता. महागाईने कळस केला होता. परिस्थितीदेखील दुष्काळाची होती. माणसाने काय खावे? अशी स्थिती होती. पूर्वेच्या कोपऱ्यात एकच गलका झाला. सत्या आला ! सत्या आला ! सत्या म्हणताच वाण्यांनी काढता पाय घेतला. भुकेलेले लोक मात्र जीवावर उदार होऊन तिथंच राहिले. ''गोर गरीबानू! उचला ! उचला जुंदळा ! रात्री

पोटभर भाकर खा.'' या सत्याच्या गर्जनेसरशी सारा बाजार फस्त झाला. गोरगरीबांना काहीतरी मिळाले या आनंदाने सत्या बेहोश झाला.

रात्र अंधारी होती, शिपायांच्या बंदोबस्तात सत्याला नेले जात होते. सत्याचे भरदार शरीर छातीतून दिसत होते. सत्याच्या मनात खळबळ चालू होती. सत्याने खंडोबाचे ध्यान करून उसात उडी मारली. इतका गोंधळ झाला की तो डाव्या हाताच्या उसात गेला की उजव्या हाताच्या या विषयीच मतभेद झाला. प्रयत्नाने जेरबंद झालेला सत्या फरारी झाला होता.

सवड मिळेल तेव्हा सत्या रक्मीकडे मुक्कामाला येत असे. सत्याच्या निरोपाप्रमाणे त्या दिवशी रानात 'सत्यनारायण' मांडला होता. नेहमी न दिसणारा माणूस त्या दिवशी रक्मीच्या घरातून लपतछपत बाहेर आलेला होता. पूजा होऊन सर्वजण प्रसादाला बसले होते. दोन अडीचशे शिपायांनी या पाचसात माणसांना गराडा घातला होता. आता सुटका होणार नाही हे सर्वांच्या लक्षात आहे. रक्मी त्याला जबाबदार आहे हे सहन न होऊन 'चांडाळणी' या शब्दात तो तिची हेटाळणी करतो. त्यावर रक्मी बोलली, 'न फसवाया मी काय त्याची बायकू हाय काय? मी तर त्याची कडू रखेली.''

न्याय कचेरीसमोर लोक गर्दी करून उभे होते. आतून एक गंभीर आवाज बाहेर येता होता. ''आमी चोर न्हाई'' न्यायालयातून सत्याला फाशीची शिक्षा झाली. तो फाशी जात आहे, पण लोक मात्र स्फुंदत स्फुंदत चालले आहेत.

## व्यक्तिचित्रे-

सत्या- डोंगराच्या घळीत राहणाऱ्या सत्या रामोशाची ही कथा आहे. सत्या रामवंशी असला तरी मनाने उदार, माणूसकी जपणारा, गोरगरिबांना मदत करणारा आहे.

कथेची नाव 'कृष्णाकाठचा रामवंशी' म्हणजे रामोशांच्या दरोडेखोरीचे चित्र असे प्रथमदर्शनी वाटते. तरी हा सत्या संपूर्ण कथेत गरीबांचा वाली, प्रेमळ, भाविक नातेसंबंध जपणारा असा चित्रीत केला आहे. याचे दर्शन अनेक प्रसंगातून घडते.

दरोडा घालायला गेलेल्या इंदापूरकरांच्या घरी जेवण घेऊनच बाहेर पडावे लागते. आदरातिथ्य केले जाते. त्या सावित्रीला तो आपली बहिण मानतो. दरोडा घालायला गेलेल्या सर्व साथीदारांसह सत्या गांगरून जातो. तिला दंडवत घालतो. म्हणजेच तो इतका भारावून जातो की दरोडेखोर आहे असे वाटत नाही. तो म्हणतो, ''सावित्रीबाई, तू खरी सावित्री, आमाला दूधभात घातला; देव तुझं कल्याण करूं. तुज्या क्येसाला धक्का बसायचा नाही बया ! हे दागिनं हवं हायती कुणाला ? जा, आपलं ठ्येव जा. मी तुजा भाऊ हाय; तू माजी भन हाइस; वेळवकत पडला तर हाक मार-'' [६] अशी ग्वाही देतो.

'सत्याची मुद्रा उग्र व क्रूर खरी पण त्याची वागणूक अत्यंत सौम्य व शांत होती. त्याचे बोलणे ममतेचे व मृदू होते. तो मधून मधून बाहेर रस्त्याकडे पाहात होता. तो कुणा मुलाच्या पाठीवर शाबासकी देई आणि कुणाला प्रेमाने जवळ घेऊन कुरवाळी.' लहान मुलांना मिठाई वाटून संतुष्ट करणारा सत्या गणू हलवाईच्या पोटावर मारत नाही. तो उपाशी मरणार नाही याकडे लक्ष देतो. कधी न पाहिलेली शंभराची नोट त्याच्या हातावर ठेवून त्याला खूश करतो.

त्याची लुटालुट ही सुध्दा गरीबांसाठी आहे. ''गोरगरिबांनू उचला !उचला जुंदळा ! राती पोटभर भाकर खा.'' ही त्याची गर्जनाच त्याची साक्ष देते.

त्याला शिपाई जेरबंद करतात तेव्हा त्याच्या मनात एक खळबळ सुरू आहे. माटे याचे वर्णन करतात. ''साटीच्या वर दोन हात या भव्य पुरूषाचे शरीर दिसत होते. वारणेपासून भीमेपर्यंत जाणाऱ्या सत्याला, दंडाला काढण्या बांधून, साटीशी आवळून टाकले होते. त्याचे रेशमी लफ्फ्याचे पागोटे कोठे तरी उडाले होते. पैरण व चोळणा एवढीच वस्त्रे त्याच्या अंगावर राहिली होती. हात जखडून टाकल्यामुळे मिशीवर पालथी मूठ पुन्हा पुन्हा फिरविण्याचे तसेच राहून जात होते. अशा शांत वेळी सुध्दा सत्या मनात कढत होता.'' [७] खंडोबाचे ध्यान मनात करून सर्व शक्तीनिशी सत्या काढण्या तोडून शिपायांच्या डोक्यावरून उडी मारून निघून जातो. यावरून तो धाडसी व साहसी तर आहेच पण कणखरही आहे याची साक्ष पटते.

रक्मी त्याची रखेली आहे. तीच शेवटी त्याचा घात करते. न्याय कचेरी समोर त्याने दिलेली साक्ष मोठी मार्मिक व त्याच्याच व्यक्तिमत्वार प्रकाश टाकते. ''सायेब, चोर कोण? मला अन् माझ्या मैतरांना तुम्ही चोर म्हनता? आमी चोर न्हाई. राम अन् सीतामाय वनात आली तव त्यांची शेवा चाकरी करीत होतो. आमाला चोर म्हनू नगा. रामचन्दर रावणाला मारून आयुद्देला परत ग्येलं तवा आमची मानसं त्येनी सांगाती न्येली.तकडं जाऊन बगा, आमची मानसं तत अजून सापडत्याल. रामाचं चाकर मनुनशान आमी रामवंशी मंजी रामुशी झालु. आमच्या नावात आमी रामाचं नाव घातलं. आमी चोर न्हाई. लइ दिस झालं पन् आमी समद्या किल्ल्याचं राकनदार होतो. तुंगभद्राकडे आमचा एक राजा बी हाय. आमी चोर न्हाई. आमाला उत्पन्न बी हाइती. पन् आमाला अशी दशा आली. आमाला चोर म्हनत्यात ! आमी कुनाचा इस्वास घात केलाय का? गरिबाला नाडलंया का? आमाला जवळ करतील त्याच्या जिवासाठी आमी जीव देऊ, आमी मर्द रामवंशी हाओ. आमाला तुमावानी बोलाया येत न्हाई, पण काळ कंदी ना कंदी फिरल, रामाची किर्पा हुईल, अन् आमाला बरं दिस येत्याल. आता आपली काय विच्छा असलं तसं करा.'' [८]

यामध्ये दलित आत्मोध्दाराच्या चळवळीचे भाकीत आहे. यावरून सत्या इमानी, शूर, भाविक मनाचा, गरिबांचा वाली आहे हे लक्षात येते.

रक्मी, यल्ल्या, सावित्री ही इतर पात्रे कथेत येतात. पण ती सत्यच्या अनुषंगाने त्याचे पात्र

उठावदार करण्यासाठी येतात.

## वातावरण-

या कथेला पूर्ण डोंगराळ भागातील पार्श्वभूमी आहे. हिंस्र पशूंना सुध्दा जिथे एकटे वाटेल अशा डोंगराच्या घळीत सत्या रामोशाचा तळ आहे.

इंदापूरकरांच्या घरावरील दरोड्याची रात्र अमावस्येची आहे. पण पुढील सर्व प्रसंगांनी सावित्री व सत्याच्या बहिणभाऊ नातेसंबंध प्रस्थापित करण्याच्या प्रसंगांनी त्या दरोड्याची भयानकता कमी होते.

या कथेत जे सृष्टीवर्णन येते ते केवळ सृष्टीवर्णन म्हणून न येता ते सत्याच्या व्यक्तित्वाचा रंग अधिक गहिरा करते. ''होता होता सडकेच्या दोन्ही अंगांनी उसाचे पीक आले. उसाची थाप लागून गेली होती. त्या अंधारात उसाचा हिरवा रंग मिसळून त्या प्रसंगाला काही भयानक रंग चढला होता. पिकाला रात्रीचे पाणी देणाऱ्यांच्या मोटेचा दुरून कुठून तरी आवाज येई तेवढाच; बाकी सगळीकडे चिडीचीप होते. शिपाई चार पाच तास सारखे चालत होते; निशेला नशा चढली होती; अंधारात हिरवळीची भर पडली होती; बढतीच्या मनोराज्यात अधिकाऱ्याचे दुर्लक्ष बळावत चालले होते; सत्याचा त्वेष अनावर चालला होता; सृष्टीव्यापार आणि मनोव्यापार एका लयीत आले. [७]

## भाषाशैली-

सत्याचे सर्व साथीदार धोंड्या, यल्लाप्पा, पांड्या, नरसू यांचे बोलणे प्रादेशिक बोलीतले आहे. हे प्रादेशिक बोलीतले संवाद घटना जिवंत करतात. बोलीतील वर्णनाने ती घटना नेटकी होते. सत्याचा साथीदार यल्ल्या लोखंडाची पेटी खांद्यावरून आणतो. तात्या त्याला म्हणतो,''यल्ल्या ! तुझा बा काय हात्ती-बित्ती हुता का रं?'' सगळे हसू लागले. ''अरं, चार गड्यास्नी हालायची न्हई ती प्येटी यानं येकल्यानं खांदाडीला मारली; आता काइ म्हनावं !'' [९]

प्रादेशिक बोलीतल्या आवेशपूर्ण संवादांनी घटना ताकदवान बनते.

बाजाराच्या दिवसाचे संपूर्ण चित्रण एका वेगळ्याच शैलीत आहे. काही वाक्ये उदाहरणादाखल देता येतील.''मिशीत धूळ, दातावर धूळ, कानात धूळ असे लोक रंजीस आले होते.''

बाबा मला खाया दे ही मुलांची होणारी मागणी, रोडावलेल्या व सोकलेल्या आयांच्या उराला लहान मुलांचे बिलगणे यावरून लोकांची गरिबी व दुष्काळी स्थिती लक्षात येते. बाजारातल्या लुटीला दुष्काळी वातावरणाची पार्श्वभूमी आहे. भाव भडकले आहेत, लोक

रंजीस आले आहेत. हा सर्व तपशील भरण्याची लेखकाची पध्दती लक्षणीय आहे. तपशील लेखक अशा पध्दतीने भरतो की सर्व प्रसंग जसाच्या तसा डोळ्यापुढे उभा राहतो.

सर्व बाजार ज्वारीचा आहे. गिडगाप, डूकरी शाळू, जंबूशेरी, पेवाचा हे ज्वारीचे प्रकार प्रादेशिकतेची जाणीव करून देतात.

शाळेत शिकवणारे गुरूजी कसे बसतात? खुर्चीच्या पाटीला रेलून आणि पायाची जुडी पुढे करून. तमाखुची चिमुट तोंडात ओलवीत. हे स्वभावोक्ती अलंकाराचे उदाहरण आहे.

सत्या, गोरगरीबांचा वाली, बाजाराची लूट करतो तेव्हा गरिबांच्यात होणारा बदल माटे पुढीलप्रमाणे चित्रीत करतात 'दुःख, जिगजिग आणि निराशा यांनी नुकत्याच भरलेल्या अफाट बाजारात उमेद, तडफ आणि आवेश यांचा सपाटा उठला.' [१०]

'एवढा गल्ला पण हातोहात उडाला.' या छोट्या वाक्यांवरून घटनेची गतीमानता स्पष्ट होते. कथेच्या सुरवातीच्या सत्याच्या सर्व वर्णनात एक नाट्य आहे. सत्याचे कथेच्या शेवटचे निवेदन लक्षणीय आहे.

### रचनातंत्र-

ही कथा अनेक विभागात लिहिली आहे. यातील कोणताही भाग वाचला तरी तो स्वतंत्र वाटावा असा आहे. सत्या हे एकच पात्र त्यांना एकत्र गुंफवण्यास कारण झाले आहे.

ही एक व्यक्तिप्रधान कथा आहे.

## ३.पुरंदरचा नामा

पुरंदरचा नामा या कथेच्या आधारे हेलकऱ्यांच्या कष्टप्रद जीवनाचे चित्रण माट्यांनी केले आहे. तसेच खेडूत व नागर माणसे यांच्यातील राहणीमान, विचारांची तफावत या कथेतून चित्रीत होते.

### कथानक-

श्रीनिवासराव, शरयूबाई, सुंदराबाई व बनूवन्सं सर्व मंडळी सृष्टी सौंदर्यानं सजलेली पुरंदरगड पहायला जातात. पायथ्यापर्यंत गाडीनं येतात तोच दहा पाच गावठी माणसं त्यांचे सामान सुमान उचलण्यासाठी गोळा होतात.

आपल्या देहस्वभावाप्रमाणे चांगले चुंगले सामान बरोबर असले म्हणजे बरे वाटते. म्हणून श्रीनिवासरावांनी पुष्कळ सामान बरोबर घेतले होते. सकाळी साडे सहाला पुण्याहून निघालेली ही मंडळी पाचच्या सुमारास घरी परतणार होती. पण मोटारीतून खाली उतरताना जे सामान निघाले ते काशी रामेश्वरला निघाल्यासारखे होते. आपल्या वैभवाने लोकांना दिपवावे ही प्रवृत्ती त्यांच्याकडे नव्हती. पण पुष्कळ वस्तू जवळ ठेवण्यात त्यांना सुख वाटे. ह्या सामानामुळे काम मिळणार आणि सामान मोहक आहे. या दोन कारणांनी हेलकऱ्यांना आनंद झाला. एखादा पाटावरवंटा डोक्यावर घेण्याऐवजी ट्रंक डोक्यावर हेलकरी आनंदाने घेतात. कुणी ट्रंक घेतली कुणी बॅग घेतली, कुणी करंडी घेतली. परस्पर हेलकऱ्यांनी श्रीनिवासरावांच्या सामानाच्या वाटण्या केल्या. यांचे दरिद्री जीवन व जीवनातील कुरूपता याविषयी श्रीनिवासरावांच्या मनात विचार खेळू लागले.

धर्मशाळेत सतरंजीवर सर्वांनी चहापान केले. ही हेलकरी माणसे आशाळभूतपणे त्यांच्याकडे पहात होती. हेलकरी कसे आहेत माट्यांच्याच शब्दांत पहा. ''हेलकऱ्यांच्या अंगावरची धडुती अपुरी, ठिगळांची, मळलेली आणि वेंधळेपणाने लेइलेली दिसत होती. ती माणसे डरजुळी, पायावरच्या शिरा कुठेतरी टारारून फुगलेली आणि कायमचीच भुकेलेली असावी, असे वाटे.''११ याउलट श्रीनिवासरावांच्या दोघी कन्या वेषभूषा व सौंदर्यसाधनांचा वापर करून नटून थटून आल्या होत्या. विद्याधर व मन्या ही नंतर येणारी मंडळी येताच सर्वांची गडावर चढण्याची तयारी झाली. या नागर लोकांनी आपल्याशी बोलावे आपल्याला काही विचारावे असे त्यांना वाटते. यांना मजुरी काय द्यावी यासंबंधी फारसा विचार न करता श्रीनिवासरावांनी प्रत्येकाकडे थोडे थोडे सामान दिले.

गड चढाईचे काम सुरू होताच माणसांचे गट पडले. नामाने मनुला खांद्यावर घेतले. कोंडी, चिमी, येश्या आणि गेन्या यांनी सामान घेतले. जाताजाता मनुबाचे मन रिझवीत त्याच्या हातात फुलांचे झुपके देत इतर मंडळी मजल दरमजल करीत मध्य डोंगरातल्या या पोस्टाच्या ओलसर इमारतीत आली. नामाने सर्वांना पाणी आणून दिले. मंडळी केदारेश्वरापाशी पोहचली. खाणे-पिणे खाली करावयाचे असा ठराव करून गड उतरू लागली.

गड उतरताना श्रीनिवासरावांनी नामाची हकीकत विचारायला सुरूवात केली. ओले कोरडे कसेतरी खाऊन जगणारा हा नामा सासवडचा आहे. जमिनीचा तुकडासुध्दा सावकाराकडे असल्याने हेलकऱ्यांचे काम करून हा जीवन जगतो आहे. नवरीचे बाप लग्नाला शंभर रूपये मागतात तेवढेही पैसे नसल्याने हा लग्न करू शकत नाही. त्याच्या जवळ राहणाऱ्या कोंडी, चिमी, गेन्या, येशा यांची कुणाचीच लग्ने झालेली नाहीत. आपण शाण्णव कुळीचे मराठे आहोत याचा त्याला अभिमान आहे. सोयरीकसुध्दा दुसरी तिसरीकडे करून कसे चालेल असे त्याला वाटते.

पायथ्याशी आल्यावर श्रीनिवासरावांनी सर्वांना फराळाचे दिले. संकोची स्वभावाच्या कोंडी, पारू या मुलींनाही आग्रहाने श्रीनिवासरावांनी आपले करून घेतले. जाताना श्रीनिवासरावांनी प्रत्येकाला नऊ आणे दिले. शरयूबाईंनीही कुणाला काही कुणाला काही दिले. नागर व खेडूत माणसांनी अशा पद्धतीने एकमेकांचा निरोप घेतला

## व्यक्तिचित्रे-

नामा- हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. हा सासवडचा राहणारा. कसे बसे ओले कोरडे खाऊन पोटाचा खळगी त्याला भरावी लागते. इतका तो दरिद्री आहे. टिचभर जमिनीचा तुकडा सावकाराकडे गहाण पडल्याने हे हेलकऱ्याचे काम तो व त्याचे साथीदार करतात.

नवरीच्या बापाला शंभर रूपये द्यावे लागतात. म्हणून ही माणसं लग्न करू शकत नाहीत. कारण इथे पोटाची खळगी भरायला यांना काही नाही ती शंभर रूपये कुठले आणतील. ग्येन्या अन् नामा एकमेकांची बहीण एकमेकांना देऊन साटंलोटं करू पाहतात पण दोघांच्याही घरची म्हातारा म्हातारी त्याला तयार नाहीत कारण दोघांनाही पैसाच हवा आहे.

नामाला आपल्या जातीचा कुळाचा अभिमान आहे. तो म्हणतो,''काका, आमी शान्नव कुळचं म्हराटं, सोयरिक हाकडं तकडं करून कसं चालंल? आमाला ही अशी दशा येऊ द्या. पन कुळाला बट्टा न्हाई लावनार! पायत्याला न्हानसा गाव हाय, ततला बामन तुमाला सांगल आमी कोन त्ये! आमचं कागुद न्येल्यात पुन्याला त्येनं.'' [१२]

शिवाजी महाराजांच्या काळात आपल्या वाडवडिलांनी पणजोबांनी मुस्लीमांशी लढाई केली. महाराजांनी खुश होऊन जरीचा मंदील, पायात तोडा व दिसणारे सर्व रान पूर्वजांना बक्षीस दिले. त्या कुळातले आपण असे नामा अभिमानाने सांगतो. पण सध्या सगळे रान ब्राह्मणाकडे, गुजराकडे आहे. छोटासा तुकडा स्वतःकडे अशी त्याची हालाखीची परिस्थिती आहे. हा परिस्थितीने गांजलेला आहे. तरी त्याला कुळाचा अभिमान आहे. पण याही अवस्थेत नामा प्रेमळ आहे. त्याचा या छोट्याशा मन्यावर जीव जडतो.

श्रीनिवासराव- हे या कथेतील दुसरे पात्र. अगदी अस्सल नागर राहणीमानाचा संस्कार झालेला हा माणूस आहे. पण तितकाच सहृदय आहे हे ही जाणवते. सामान गडावर नेण्याच्या दराची घासाघीस करणे त्यांना प्रशस्त वाटत नाही. नामाची ते आस्थेने चौकशी करतात. त्याला पुण्याला कामधंदा पाहण्यासाठी मदत करण्यास तयार होतात. सामान सुमान जास्ती घेऊन प्रवास करणे, प्रवासातील येऊ शकतील अशा अडचणींवर मात करण्यासाठी काळजी घेणे, पुष्कळ वस्तू जवळ बाळगणे यात त्यांना विलक्षण सुख वाटते.



13519

## वातावरण-

पुरंदरच्या भव्य सृष्टीवैभवानं नटलेल्या डोंगरावर चढण्याच्या विशेष उपक्रमाची याला पार्श्वभूमी आहे. पण या पार्श्वभूमीवर माट्यांना विशेष उठून दिसतो तो हेलकऱ्यांचे काम करणारा नामा. ग्रामीण व नागर अशा दोन्ही संस्कृतींचे चित्रण व या दोन्ही वातावरणामुळे कथेत वेगळेपणा आलेला आहे.

चिमी, गेन्या, येशा सर्वांना या नागर संस्कृतीबद्दल विशेष आकर्षण आहे. श्रीनिवासरावांनी दिलेल्या फराळावर ही माणसे संतुष्ट होतात, त्यांना दुवा देतात. वेडेवाकडे असे काहीच घडत नाही. केवळ जे आहे ते चित्रीत केलेले आहे.

ग्रामीण व नागर दोन्ही परस्पर विरोधी अशा प्रकारचे चित्रण लेखकाने या कथेत केलेले आहे. नागर व खेडूत यांच्या राहणीमानातील भिन्नता दाखवत नामा या प्रातिनिधिक व्यक्तिच्या आधारे हेलकऱ्यांचे दयनीय जीवन चित्रीत करणे हा या कथेचा हेतू आहे. कथानकाच्या दृष्टीने ही कथा पाल्हाळिक वाटते. कथेच्या शीर्षकाप्रमाणे नामाचे व्यक्तिमत्व एक दोन पानात संपवून सहलीचे वर्णन पाल्हाळिक पद्धतीने केलेले आहे. एकूण ही कथा वाचकावर प्रभाव टाकू शकत नाही. कथेचे रचनातंत्र या लेखनात पाळलेले दिसत नाही. पुरंदरची सहल व त्या ठिकाणी भेटलेला हेलकरी नामा यांचे हे वर्णन आहे त्यामुळे हे लेखन एखाद्या ललित लेखासारखे वाटते.

# ४.तारळखोऱ्यातील पिऱ्या

## कथानक-

कृष्णा नदी व सह्याद्रीचे उंच डोंगर यांच्या मध्ये सातारा जिल्ह्यातून तारळी नदी वाहते. भोवतालचा प्रदेश म्हणजेच तिचे खोरे. खोऱ्याची भूशास्त्रीय रचना तसेच मानवी प्राण्यांची रचना, मोठी मार्मिक व सूचक पद्धतीने सांगितली आहे. वेगवेगळ्या माणसांच्यासाठी वेगवेगळे थर आहेत. या थरात मुस्लिम, गुजर, मारवाडी, देशस्थ ब्राह्मण, मराठा कुणबी, मांग, रामोशी अशा विविध थरातील माणसे राहतात. या गढूळ समाजसरोवरात तळाशी असणारे कासव म्हणजे पिऱ्या मांग.

पिऱ्या फरारी होता. त्याचा शोध घेत पोलीस हिंडत होते. नाईक त्याच्या शोधार्थ येतो. पण आपली कुवत त्याला पकडण्याची नाही हे त्याच्या लक्षात येते. नाईक आपल्याला पकडू शकणार नाही अशी त्याची खात्री आहे. आपली गाठच पडली नव्हती हे तुम्ही सरकारला सांगा असे पिऱ्या त्याला सांगून जणू औदार्यच दाखवतो.

सह्याद्रीच्या कडेकपारीचा भव्य रांगडा कणखरपणा घेऊन पिऱ्या वावरत होता. पिऱ्याला सृष्टीने उग्र वैभव बहाल केले होते. हाडापेराने तो मजबूत होता. डोंगरकपारीतील पाषाणासारखा तो वाटत होता. बामनाच्या नाईकाप्रमाणे वेष घेऊन पिऱ्याने आपल्या शोधात येणारा पोलीस बरोबर ओळखला होता. पण पिऱ्याला एकदोघा पोलीसांनी धरणे शक्य नव्हते. ह्या प्रसंगाने नाईक अगतिक होतो. पिऱ्या मात्र विनोदी वृत्तीने त्याला सामोरा जातो. दोघांचा मनोमिलाप होतो. एखादा तालेवार आपल्याला हुलीवर घालतो आणि असली कृत्यं आपण करतो व यातून मुलाबाळांच्या संपर्कालासुध्दा मुकतो हे आपल दु:ख पिऱ्या त्याला सांगतो. त्याचा सूर समजावणीचा आहे. अमावस्या केव्हा येते हे विचारायला मात्र तो विसरत नाही.

चंद्री ही पिऱ्याची बायको. आपला परंपरागत धंदा चंद्री व पिऱ्या दोघांनाही नको होता. केकताड कापणे, भिजत घालणे, त्याचा वाख करणे असले काम क्षुद्र व नेभळेपणाचे असे दोघांनाही वाटे. दोहोंचा एकमेकांवर भारी जीव. नवऱ्याचे सुख तेच आपले सुख असे मानून ती प्रत्येक साहसासाठी पिऱ्याच्या बरोबरीने जाण्याची तयारी दाखवी. सरकारी माणसे पिऱ्याच्या मागावर असल्याने खंडोबाच्या जत्रेला पिऱ्याने जाऊ नये असा सल्ला ती त्याला देते. पण तो ते ऐकत नाही. खंडोबा आपल्या सुध्दा पाठीशी आहे, असा त्याचा ठाम विश्वास आहे.

पालीच्या खंडोबाच्या उत्सवाला तमाम हिंदू बांधव जमा होतात. खंडोबाच्या देवळाची रचना माट्यांनी सविस्तर वर्णिली आहे. खंडोबाची पालखी म्हाळसाईच्या मंडपात जाते व तेथे खंडोबा व म्हाळसा यांचे लग्न होते. भंडारा उधळला जातो. मग जत्रा फुटते. पालीच्या जत्रेचे हे विस्तृत वर्णन माट्यांनी केले आहे. विशेष म्हणजे मातंगांना सुध्दा पालखीला हात लावण्याची मुभा असते. सर्व मातंग समाजातील गुन्हेगार देखील हा उत्सव चुकवत नाहीत. पिऱ्यासुध्दा हा वर्षाचा दिवस वाया घालवणार नव्हता. गर्दीत एका म्हाताऱ्याचे रूप घेऊन शिरलेला पिऱ्या हऱ्या रामोशाचा पवाडा ऐकत बसला होता. त्याला वारंवार तेथून बाहेर पडण्यासाठी सांगितले जाते. जुने पांढरे पागोटे कानशिलावर तिढे देऊन बांधलेले, गालावर पांढरी झुलपे अशा वृध्दाच्या वेशात असलेला पिऱ्या खंडोबाचे लग्न होईपर्यंत थांबतो. जत्रा विसकटताच सरकफास टाकून त्याला पकडले जाते.

शिपायांनी त्याचा सर्व बेगडी वेश काढला. काखेत लोंबणारी फरशी काढून घेतली. त्याला जेलबंद केले. कोर्टाचा निकाल लागून काळ्या पाण्याच्या शिक्षेवर त्याला पाठविले जाते. खंडोबा तुला सुखी ठेवील. जगलो वाचलो तर आपण परत येऊ असे पिऱ्या चंद्रीला सांगून निघून जातो.

पिऱ्याची आठवण जग अजून विसरले नाही.

## व्यक्तिचित्रे-

पिऱ्या- हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. सृष्टीने सर्व उग्र वैभव त्याला बहाल केले आहे. तारळी नदीच्या परिसरात, सह्याद्रीच्या उंच डोंगरात कायम राहिल्याने तो सुदृढ आहे, हाडापेराने मजबूत आहे. केकताडाची चऱ्हाटे करून ती बाजारात विकत बसावे हा परंपरागत धंदा त्याला मान्य नाही. चऱ्हाटे करण्याचे क्षुद्र व नेभळे काम नको म्हणून तो पुंड बनला होता. कोणीतरी आपल्याला हुलीवर घालतो अन् ती कामे करण्यासाठी मुलालेकरात आपल्याला रहायला मिळत नाही याचे त्याला दु:ख आहे. त्याचा स्वभाव भाबडा आहे.

वृत्तीने बेडर पण क्षमाशील असणारा पिऱ्या आपल्याला पकडायला ब्राह्मणरूपात आलेल्या पोलीसाला सोडून देतो. पण खंडोबाची जत्रा असणाऱ्या अमावस्येचा दिवस तो त्याच्याकडून विचारून घेतो.

पालीच्या जत्रेचा नाद सोडा असे त्याची पत्नी त्याला सांगते. कारण सरकारी माणसे जिकडे तिकडे त्याचा पाठलाग करीत होती. पण तो उत्तर देतो ते मोठे मार्मिक आहे. ''तू अशी बोलतियास? चन्द्राबाई, तू अशी बोलतियास? समद्या पिर्तिमित आपल्याला कुनी हाये काई? येक आपलं जातवालं, अन् दुसरा पालीचा खंडुबा. वर्सातनं येकदा दरसानं घडतया, त्येवडं बी सोडलं तर चोरी-दरूड्या पलीकडं काय रायलं? [१३] म्हणजे केवळ चोरी दरोडे करून उदरनिर्वाह करावा अशी त्याची भावना नाही. यापेक्षाही खंडोबाचे दर्शन वर्षातून एकदा का असेना पण झाले पाहिजे. असा पिऱ्या वृत्तीने भाविक आहे. खंडोबा आपल्यासुध्दा पाठीशी आहे ही त्याची श्रध्दा आहे. तो जत्रेला जातोच. या ठिकाणी तो धीरोदात्त नायक वाटतो.

खंडोबा त्याच्या श्रध्देचा भाग आहे. त्याला जेव्हा जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा होते तेव्हा चंद्रीला तो शेवटी जे सांगतो ते मूळातूनच पाहण्यासारखे आहे. आपण मुळचे दरोडेखोर नाही हे तो सांगतो. तो म्हणतो,''कारबारनी, ए चंद्राबाई, खंडोबा तुला सुकी ठेवील. म्या काय क्येलंया ! तालेवारांनी सांगितलं म्हूनशान क्येलं, पन त्येंचा जरीचा मंदिल त्यंच्या टकुरीला ऱ्हाईला; त्येंची कंठी त्येंच्या गळ्यात ऱ्हाईली; अन् माझ्या हातापायात या बेड्या आल्या बगं; चंद्रे रडू नगं; तोंडात माती घालू नगं; तुज्या पोटी मी येतुया, जो पोरगा हुईल त्याचं नाव खंडूबा ठिव; कपाळावर हानून घेऊ नगं; त्येला लिवनं शिकव; त्यो मोटा झाल्यावर इचारील की; माजा बा कुटं हाई; तर त्येला सांग की; त्यो साता समिंदराच्या पलिकडे काळ्या पान्यावर हाई. जगलू वाचलू तर अजून बी परत येईल.'' [१४]

आपल्या पोटी येणाऱ्या मुलाला शिक्षणाचा संस्कार मिळावा ही त्याची मनापासूनची इच्छा आहे. इथे माटे यांचे शिक्षकाचे मन डोकावते. शिक्षणानेच हा समाज सुधारेल ही त्याची श्रध्दा आहे.

चंद्री- हे या कथेतील दुसरे पात्र. ती पिऱ्याची बायको आहे. पिऱ्याच्या व्यक्तिमत्वाला शोभेल असाच धीटपणा तिच्या ठिकाणी आहे. पिऱ्याची फरशी तिने दंडावर कोरून घेतली आहे. पिऱ्या कुठे आहे? याचा माग काढण्यासाठी शिपाई लोक तिला पुष्कळ जाच करीत. तिही तेवढीच कर्तबगार व नवऱ्याला शोभेशीच बायको होती. तिची जरब मोठी होती. पायात करकरीत चपला घालून ही साहसी स्त्री रात्री अपरात्री त्याच्या मुक्कामाच्या ठिकाणी जात असे. पिऱ्यावर तिचा भारी जीव. पालीच्या खंडोबाच्या जत्रेत येऊ नये असा सल्ला ती पिऱ्याला देते. पिऱ्याला जेव्हा काळ्या पाण्याची शिक्षा होते तेव्हा ती धाय मोकलून रडते. ती एक धाडसी स्त्री आहे.

या कथेत शिपाई, नाईक ही व्यक्तिचित्रे कारणपरत्वे येतात.

## वातावरण-

पिऱ्याच्या व्यक्तित्वाला उठाव देणारी तारळखोऱ्यातील डोंगर कपारीची पार्श्वभूमी या कथेला आहे. किर्र घनदाट जंगल, रात्री अपरात्री पिऱ्याबरोबर चंद्रीही या खोऱ्यातून फिरते. या डोंगर कपारींना ही इथे एक व्यक्तित्व प्राप्त होते. पिऱ्या हा जणू निसर्गाचेच लेकरू आहे. या निसर्गाशी तो एकरूप कसा झाला आहे हे माट्यांच्याच शब्दांत पाहा, ''चंद्रीने झाडाखाली गार पाला खूप अंथरला होता, आणि त्यावर पिऱ्याचे घोंगडे घातले होते. चंद्रीच्या मांडीला डोके देऊन पिऱ्या सताड पसरला होता. आडरानातील डोंगराचे पठार, झाडांची सावली, वर नीलवर्ण आकाश आणि सभोवती दूरवर पसरलेली रानजमीन, नवरा बायको सुखाने बोलत होती.'' [१५]

पालीच्या खंडोबाच्या जत्रेच्या वेळी खंडोबा अन् म्हाळसा यांचे होणारे लग्न, उधळला जाणारा भंडारा, निघणाऱ्या पालख्या, अशा सर्व धार्मिक वातावरणाची पार्श्वभूमी या कथेला आहे. खंडोबाच्या जत्रेला जाणारा अखिल मातंग समाज म्हणजे त्या जामातीच्या श्रध्दाळूपणाचे ते लक्षण आहे.

## संवाद-

या कथेतील सर्व संवाद हे ग्रामीण म्हणजे त्या लोकांच्या बोलीत आहेत. याचा नमुना म्हणजे पिऱ्याचे हे निवेदन पाहण्यासारखे आहे. ''मंग काय म्हनतियास? केकताड कापाया जाऊ? का ढोरांचं मुडदं फाडू आन् कातडी मुसुल्मानाला इकू? काई करू तरी काई? ह्ये बग, ह्यो पिरा गुराचं मुडदं फाडाया अन् चराट वळाया जल्माला न्हाइ आला, हाडकी हाडुकी ह्या करनार न्हाइ, योक वादाडा मारीन कुनाला, तर वर्साची बेगमी करीन तुजी. असा म्येललं आन खानारा न्हवं हा पिऱ्यां. अग, तू का घाबरतियास ! खंडुबा आपल्या पाठीवर हाये, जत्रंला मातुर सोडू नगं.'' [१३] ही भाषा बोली आहे. ती नैसर्गिक आहे. या बोलीभाषेत एक ताकद आहे.

'पोटी येणाऱ्या मुलाल लिवनं शिकीव' असं सांगणारा पिऱ्या शिक्षणाचे महत्व ओळखतो. म्हणूनच तो हा सल्ला देतो. पिऱ्या व चंद्री यांच्यातले संवाद कथेला पिळदारपणा देतात. चंद्रीची मराठमोळी बोली कथेचा वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहे.

पालीच्या खंडोबाच्या देवळाचे वर्णन सर्वांगसुंदर झाले आहे. जत्रेचे वर्णन तपशीलवार आहे. ह्ऱ्या रामोशाचा पवाडा चालू होता. हे सांगून पवाड्याची कडवी दिली आहेत. कथेतले जत्रेचे वातावरण जिवंतपणे वाचकासमोर येते. जत्रेत वेशांतर केलेला पिऱ्या, भोवतालचे पोलीस, टिकारणी उंच धरून चाललेला मांग समुदाय हे दृश्य यथातथ्य रेखाटले आहे. माट्यांची ही चित्रदर्शी लेखनशैली वेधक आहे. त्यामुळे वाचक त्यात रंगून जातो.

कथेतील वातावरण भरदार व जिवंत ठेवण्यात माटे यशस्वी झाले आहेत. सुरवातीची पिऱ्या व पोलीस यांची गाठ, पिऱ्या व चंद्री यांच्यातले संवाद व आडरानातील डोंगर पठारावर नवरा बायकोंची पडलेली आनंददायी गाठ, पालीच्या खंडोबाच्या यात्रेचे वर्णन या साऱ्या गोष्टी त्या त्या वातावरणात माट्यांनी जीवंतपणे उभ्या केल्या आहेत. माट्यांची लेखणी त्या त्या ठिकाणचे वातावरण तरलपणे तोलून धरते.

जत्रेत कोण जमले होते ते पाहता माटे किती सूक्ष्मपणे वर्णन करतात ते लक्षात येते. 'येथे हजारो यात्रेकरू जमलेले; स्वाभाविकच मिठाईवाले, भंडारावाले, खाणावळवाले, कापडवाले, खारीक खोबरेवाले, पवाडे म्हणणारे, तमाशेवाले, ख्रिस्ती मिशनरी, परिषदा भरविणारे, डोंबारी, भंडारी, उचले, घंटीचोर, गुप्त पालीस, उघड पोलीस असे नाना प्रकारचे लोक आपापल्या दृष्टीने या जनसंमर्दाकडे पहात दाखल झाले होते.' [१६]

माटे या व्यक्ती रंगवितात त्यांचा तपशील अगदी सुक्ष्म वर्णन करतात. ते प्रधान पात्र असो किंवा दुय्यम. ब्राह्मणाच्या रूपात पिऱ्याला शोधायला आलेला पोलीस मध्यम उंचीचा, अंगासरसा जाडजुड, धोतराचा एक काचा मारलेला, कसे राखलेले अन् उर्मट वळणाचा रूमाल बांधलेला आहे.

माट्यांनी चित्रीत केलेली माणसे माणुसकीचा कुठलाही धागा व्यक्त करायला विसरत नाहीत. पिऱ्याला शिपायांच्या तावडीतून सुटण्यासाठी सूचना देणारा शिपाई वर्गातीलच एक शिपाई जेव्हा पुन्हा चंद्रीला भेटतो तेव्हा तिच्या डोळ्यातून कृतज्ञतेने पाणी येते.

या कथेत नाट्य आहे. व्यक्तिप्रधान असणारी माट्यांची श्रेष्ठ कथा आहे असे म्हणता येईल.

## ५.सतीचे शस्त्र

सतीचे शस्त्र ही एक वैशिष्ट्यपूर्ण प्रसंगांवर बेतलेली कथा आहे.

## कथानक-

शहरी वातावरणात बांधकामाच्या ठिकाणी तिसऱ्या मजल्यावर कथेची सुरूवात होते. तंबाखुचा गुळणा तोंडात धरून बाळा गवंडी उभा होता. प्रत्यक्ष बांधकाम बंद होते. पण बांधकामाचे साहित्य वर नेणाऱ्या बायका कुजकुजत आपले काम पूर्ण करीत होत्या. म्युनिसीपालटीचे लोक गर्दीकडे पहात उभे होते. समोरच्या घराचे मालक दादासाहेब इंजिनियर, दहापाच मोलकरणी अशी बघ्यांची, पुष्कळ गर्दी होती. एक विधवा मराठा बाई अत्यंत त्वेषाने बाळा गवंड्याकडे पाहून जळफळून ओरडत होती. शेजारीच चारपाच वर्षांचा मुलगा उघड्या-नागड्या अवस्थेत कावराबावरा होऊन रडत होता.

दोन वर्षाखालीच सईचा नवरा वारला होता. रामा भिंगारे मोठा मर्द माणूस ! कामावरून आल्या आल्या ज्या जागी बसला तिथेच त्याची प्राणज्योत मालवली. पोर लहानाचे मोठे केले पाहिजे व जीव जगवला पाहिजे या उद्देशाने एक दोन घरचे काम करून नामाकडे पाहूनच सई सुख दु:खाचे अनुभव घेत होती.

ज्या ठिकाणी काम सुरू होते तोच तिच्या जाण्या येण्याचा रस्ता. बाळा गवंड्याचे वर्तन ठीक नाही हे स्त्रियांनी ओळखले होते. बाया माणसे दिसली की बाळा गवंड्याची चर्या बदलत असे. कोणी बाई देखणी दिसली की तो त्यांना ए भानामती, ए रंगारानी अशा हाका मारीत असे. सईला दोन तीनदा पाहिल्यावर त्याच्या चावटपणाला सुरूवात झाली. तिला पाहताच चित्रविचित्र आवाज काढायला त्याने सुरूवात केली. ''कुठलं पाखरू हाइ रं?''हे शब्द देखील तिला ऐकून घ्यावे लागले. सईने त्याचा समाचार घ्यायला सुरूवात करताच आपण बोललोच नाही असा पवित्रा त्याने घेतला. त्याच्या हाताखालच्या दगडू नावाच्या गड्याने देखील कोणाकडूनच बोलायचे नाकारल्यावर त्याला त्वेष चढला. अन शेफारल्यासारखा तो बोलला,''का ग, ए वडारनी ! काय दिली दगड्यानं साक्षा?''

सई गोंधळली. इतक्यात दादासाहेब इंजिनिअर पुढे आले. अधिकाराच्या आवाजाने टाफरले,''ए बाळया! तू या मोलकरणीलाच पाखरू म्हणालास ! मी खिडकीतून पाहतो आहे. आता का भितोस?''[१७]

अधिकारी व्यक्तीची साक्ष ऐकून बाळा गवंडी पालटला. पण सईला मात्र या प्रसंगाने धीर आला. कथेचा एकूण कल इथे पालटला. आपण मर्दाची अस्तुरी असल्याचे तिने त्याला सांगितले. तिचा त्वेष पाहून व बाळा गवंड्याचे पूर्वीचे त्रासदायक वर्तन सोसून इतर बायकांनीही त्या प्रसंगी सईला साथ दिली. 'अस्संच पाहिजे असल्या मुडद्यांना' हे उद्गार नकळतपणे त्यांच्या तोंडून बाहेर पडले. त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या बायकांना ती असल्या माणसाच्या हाताखाली काम न करण्याचा सल्ला देते. आपल्या नवऱ्याच्या जोड्यानं त्याला मारण्याची ती

त्याला धमकीवजा सूचना देते.

आपला पदर सावरून ती आपल्या रडणाऱ्या मुलाला घेऊन जाते. बाळा गवंडी पुन्हा कामाला लागतो. पण जाणारी शाळकरी मुले सुध्दा त्याचा 'हट लेका !' या शब्दात तिरस्कार करतात.

## व्यक्तिचित्रे-

**सई-** हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. माट्यांच्याच शब्दात सईचे वर्णन पाहण्यासारखे आहे. 'सई नाकी डोळी नीटस आणि थोडी तांबूस असते. घरची गरिबी असली तरी नवरा असताना, अन् आताही खाण्यापिण्याला मोताद नव्हती. थोडा कामधंदाही करावा लागत असल्यामुळे, तिची कांती रसरशीत दिसे. तिच्या अंगाखांद्यावर काहीच नव्हते, पण टुकीने रहात असल्यामुळे चोळी लुगडे नेसायला तिला कमी नव्हते. सई कजाग किंवा भांडकुदळ नव्हती हे खरे, पण जिथे तिथे हसणारी किंवा लाघवीही नव्हती. तिचा हा मूळचा स्वभाव वैधव्याच्या आपत्तीने आणि मोल मजुरीच्या जाणिवेने थोडा कडक झाला होता.' [१८]

बाळा गवंडी सारखा रंगेल प्रवृत्तीचा माणूस जेव्हा तिची छेड काढतो, हाताखालचा गडी जेव्हा काहीच साक्ष देत नाही, तिच्या प्रतिकाराचे पारडे जेव्हा तिच्यावर उलटतो तेव्हा ती गोंधळते. पण दादासाहेबांसारखा सत्प्रवृत्तीचा माणूस जेव्हा तिची बाजू घेतो तेव्हा तिला त्वेष चढतो. अशा माणसाच्या हाताखाली काम न करण्याचा सल्ला तर ती त्यांना देतेच पण बाळा गवंड्याला ही ती ठणकावून सांगते. "....बरं का ए वडारा? मालिक मरून गेल्याती, पन त्यांचा जोडा जपून ठिवलाया म्या ! जर का पुना असं बोललास तर त्याच जोड्यानं तुझं पैलवानाचं ढ्यार फोडल्याबिगर ऱ्हायची न्हाइ !" [१९]

सई स्वाभिमानी आहे. ती स्त्री जातीच्या त्या काळच्या सर्व मर्यादा पाळते कारण डोकीवर पदर व कोपऱ्याच्या पुढे पर्यंत चोळी असा तिचा पोषाख कथेत येतो. आपलं काम आणि आपला मुलगा एवढेच जरी तिचे विश्व असले तरी आलेल्या प्रसंगाला ती तोंड देते. माट्यांच्या कथेत येणारी माणसं कष्टाळू आहेत. सई ही त्यापैकीच एक आहे.

**बाळा गवंडी-** हे या कथेतील खलनायकी प्रवृत्तीचे पात्र आहे. बाळा गवंडी भला धष्ट पुष्ट, काळा कुळकुळीत आणि रंगेल आहे. त्याच्या रंगेलपणाला शोभेल असा मुंडेछाट पांढरी पैरण, डोईचा जरीचा तांबडा-लाल रूमाल अन् हातात चांदीचे दांडगे कडे असा त्याचा पोषाख आहे. वृत्तीने रंगेल असणारा बाळा गवंडी सई नावाच्या विधवेची छेड काढतो. बायकांना, "ए भानामती, ए रंगारानी' अशा हाका मारण्याची त्याची प्रवृत्ती त्याच्या पाचकळपणाची साक्ष पटवते.

दादासाहेब इंजिनियर हे अनुषंगाने येणारे सत्प्रवृत्तीचे आणखी एक पात्र या कथेत आहे.

## वातावरण व भाषाशैली-

ही कथा शहरात घडते पण तरीही ग्रामीण वातावरणातील माणसांचे चित्रण या कथेत केले आहे. घडणाऱ्या प्रसंगाच्या ठिकाणी बघ्याची भूमिकाच सर्वजण घेतात. घडलेल्या प्रसंगावर दगडू हा बाळा गवंड्याच्या हाताखालचा माणूस खरे माहित असूनही बोलू शकत नाही. कारण परिस्थितीने तो रंजीस आला आहे. बाळा गवंड्याचा त्याला विचारण्याचा सूरही खड्या आवाजाचा आहे.

माटयांनी दादासाहेब हा अधिकारी माणूस मुद्दाम योजून कथेला वेगळी कलाटणी देऊन सईच्या गोंधळलेल्या मनाला उभारी देण्याचे काम केले आहे. कथेचा सूर एकदम पालटतो.

अस्सल ग्रामीण असे अनेक शब्द या कथेत येतात. मेल्या, मुडद्या, वडारा, रांडावनी, वडारनी, त्वांड, ढ्यार, रंडकी, मुंडकी असे अनेक अस्सल ग्रामीण शब्द कथेत वापरले आहेत.

पण या छेडछाडीच्या घटना वर्णनामुळे मनात एक खिन्नतेचे सावट राहते. एका स्वाभिमानी स्त्रीने केलेल्या यशस्वी प्रतिकाराचे हे एक पिळदार घटनाचित्र आहे.

ही कथा शहरात घडते हे खरे आहे. पण घर बांधणाऱ्या बाळा गवंड्याचे व सई या विधवा स्त्रीचे भांडण चितारणारी ही कथा मजूर माणसातील वातावरण जिवंत करताना दिसते. अर्थातच त्यांच्यातील संवादाची भाषा ही ग्रामीण आहे, बोली आहे. ह्या अडाणी मजूर माणसांची ही प्रादेशिक बोली अस्सल व ठसठशीत वठली आहे. सईचे वैधव्यातील एकाकीपणा हेरून रंगेल बाळा गवंडी तिची छेड काढतो पण सई वस्ताद होती. बाळा गवंड्याच्या बाईलवेडेपणावर साहसी घाव घालून त्याचा बुरखा तिने फाडला आहे. सईने बाळाला दिलेला झटका मार्मिक व परखड आहे.

# ६.हास्याचा शोध

## कथानक-

मुंबईत राहणे हवापाणी, प्रकृतीमान या सर्वच दृष्टींनी माटयांना बरे वाटते. माणसांची जा ये नाही, व्याख्याने नाहीत, 'पानीवाल्या नारीयलचा' आस्वाद घेत केव्हा सकाळी केव्हा संध्याकाळी फिरायला जावे असा दिवसभराचा कार्यक्रम असतो. भोजनाची व्यवस्था खाणावळीत असल्याने कुटुंबालाही त्रास नसतो. थोडक्यात मुंबईत राहणे त्यांना बरे वाटते.

हे सर्व वरवरचे आहे. कारण मुंबईत फिरताना मनात एक वेगळ्याच प्रकारचे विचार घोळत असतात. बरोबर कुणी असेल तर गप्पा गोष्टीत वेळ जातो. पण बऱ्याच वेळा एकटे जावे लागते.

ग्रँट रोडवर आले की डोळे नसणारी मुले, म्हाताऱ्या बाया, भेसूर महारोगी समोर येतात. या सर्वांनाच पैसा देण्यासाठी तेवढे जवळ पैसे नसतात. पण स्वत: आपण गुन्हेगार आहोत असे वाटू लागते. एवढ्या सर्वांना देण्याची दानत आपल्याकडे नाही या गोष्टीचा अवमान वाटतो. आणि सर्वांना द्यावी ही एक हौस क्षणभर वाटते ती लगेल कमी होते.

पुलावरून पुष्कळ लोक दिसायला देखणे, श्रीमंत, उंची वस्त्रे परिधान केलेले आपापल्या गाडीतून मौजमजा करीत गप्पागोष्टी करीत जात असतात. यावरून सर्व ठीकठाक आहे असा आपला समज असतो. पण लेखकाला दिसतो तो फुटपाथवर 'तुका म्हन्ये' असे गायन करीत असलेला आंधळा. दिवसभर एखाद्या छोट्याशा बोगद्यासारख्या खोलीत काम केल्यावर त्यांनी हसत खेळत मौज मजा करीत जाणे स्वाभाविक आहे. पण लेखकाची वृत्तीच तशी नाही. त्याच्या त्या बोलीवरून तो सातारचा आहे असे वाटून जास्तच वाईट वाटते. याना इथे आणतो कोण, घरी कोण नेतो असे प्रश्न मनात येऊन हास्यविनोद कुठल्या कुठे निघून जातो.

कधीतरी लेखक त्यांना मदतसुध्द करतो. युनिव्हर्सिटी पर्यंत ओझे नेऊन दिल्यावर ठरलेले चार आणे तर तो देतोच पण 'हे चार आणे तुम्हाला आणखी घ्या, आणि समोरच्या हॉटेलात जाऊन थोडा चहा पाव खा.' म्हणून देतात. त्यांनी जाताना डोळयात माणूसकी आणून सलाम केला पण हसले नाहीत.

मनाला थोडासा दिलासा मिळून लेखक बाहेर पडतो तोच एक कफल्लक त्यांना दिसतो. पूर्वी कधीतरी याने कमावलेले शरीर आता लयाला गेले होते. पोट भकाटीला गेलेले, अंगावर फाटकी जीर्ण झालेली वस्त्रे अशा अवस्थेत भाजक्या शेंगा विकणाऱ्या बाईकडे तो आशाळभूतपणे पहात आहे. कित्येक दिवस आंघोळ न केल्याने मळकटलेल्या अवस्थेतील या माणसाला लेखक चार आणे देतो. दुसऱ्या दिवशी तोच भिकारी उजव्या बाजूच्या झाडाखाली म्हणजे जागा बदलून बसला होता. कुठे राहतो, त्याने काय खाल्ले, याची चौकशी कोणी केली किंवा नाही. असे अनेक प्रश्न मनात येऊन प्रापंचिक काही गोष्टी हौसेने खरेदी करण्याची इच्छाच नष्ट होते.

कोणाला घरी उतरून घ्यायला स्टेशनवर जावे तर गिरगाव रस्त्याला धोबी तलावाकडे एक आंधळा उभा असतो. गाडी उभी राहण्याचे ठिकाण पाहूनच जागा ठरवून उभा असणारा आंधळा गाडी आली की जोराने अंगाला हिसके देत ओरडतो. काही तरी त्याला द्यावे वाटते पण देणार तरी किती? श्रीमंतांनी तरी कुणाकुणाला द्यावे? दान करून प्रश्न सुटत नाहीत. आपल्याला वाटते सरकारने द्यावे. सरकारने यांच्यासाठी काहीतरी करावे. पण अन्नधान्य उत्पादन व प्रजा यांची सांगड केव्हातरी घालता येईल का? असे हे मुंबईत फिरण्याचे दु:ख आहे. श्रीमंत व गरीब यातला फरक मुंबईत प्रकर्षाने जाणवतो. कमी जागेत जास्त माणसे व उंच उंच हवेल्यात लहान कुटुंबे शेजारी शेजारीच असतात. हा शेजार धर्म मनात उद्वेग निर्माण करतो. असे एकट्याने बाहेर

पडावे तर हसायला येतच नाही. समुद्रकाठी पाण्याची मजा पहायला जावे तर बुटपॉलिशवाला आडवा येतो. एखाद्याला पैसा द्यावा तर आभार मानून तो इतक्या वेगाने पुढे जातो की समाधान आनंद मिळतच नाही. ह्या दारिद्रयाच्या वाळवंटात हास्य सापडणार कुठुन?

मुंबईत त्यांना डोळ्याच्या डॉक्टरकडे वरचेवर जावे लागते. डॉक्टर आपल्या विद्येत तरबेज असल्याने गर्दीही भरपूर. जाण्यासाठी लिफ्टची व्यवस्था होती. पंचवीस वर्षे वयाचा हा लिफ्टमन वर्णाने काळा होता. दोन्ही पाय पोटाशी घेऊन खिन्न मनाने तो मधून मधून रस्त्याकडे पहात असे. हसत खेळत, गुणगुणत शीळ वाजवत काम करावे हे त्याला माहितच नाही. खिन्न मनाने एकटक जमिनीकडे पहात असे. एखादा मनुष्य कायम येतो इतका देखील ओळखीचा भाव त्याच्या चेहऱ्यावर नाही. उलट घुमेपणाच कायमचा चेहऱ्यावर वस्तीला. तो कसा आहे याचे वर्णन माट्यांच्याच शब्दांत 'तांबड्या काड्यांचा त्याचा तो भरड कापडाचा सदरा, गुडघ्याखाली फारसा न पोहचणारा त्याचा पाच हाती पंचा, नकाशात डोंगर दाखविलेले असतात तशा घामाच्या आकृती उठलेली त्याची चाकोलेट रंगाची विटकी टोपी, आणि हात पाय पसरून त्याच्या तोंडावर सताड निजलेले ते त्याचे कायमचे सुतक यांनी माझ्या मुळच्या कष्टी मनाला जास्तच कष्ट होत.' [२०] पायरीवर चढता चढता लेखक अडखळून पडतो, त्याची टोपी उडून जाते पण त्याच्या चेहऱ्यावर हास्याची एखादी सुरकुती नाही. इतकं त्याचं दु:ख आहे का की हसावंस वाटू नये. जगाशी जणू संबंधच नाही असे त्याचे वागणे आहे. बऱ्याच दिवसांनी जेव्हा डोळ्याच्या डॉक्टरकडे असणारे काम संपते व अगदी जाणीवपूर्वक थांबून माटे त्या लिफ्टमनच्या हातावर एक पावली ठेवतात.

'ती हातावर पडताच त्याच्या तोंडाला तजेला आला. सबंध मान वर करून त्याने माझ्याकडे खुषिने पाहिले. चार पांढरे स्वच्छ दात ओठांचा बंधारा फोडून बाहेर पडले व आनंदून त्याने दोनदा मान हलविली! त्या दिवशीचा माझा उद्वेग साफ नाहीसा झाला, कारण एक गरीब मनुष्य हसला होता.' [२१]

## भाषाशैली-

हा एक ललित लेख आहे. ललित लेख लिहीताना माट्यांनी नागरभाषाच वापरली आहे. पण ती ही संपन्न अशा स्वरूपाची आहे. फूटपाथवर भीक मागणाऱ्या कफल्लक भिकाऱ्याचे ते वर्णन करतात की जणू त्याचे दैन्य आपल्या समोर मूर्तीमंत उभे रहावे. 'त्याला भुकेची नशा चढली होती. आणि त्याचे डोळे लाल झालेले होते व सगळ्या जगाकडे तो धुत्कारून आणि दरडावून पाहात होता, त्याचे पोट भकाटीस गेलेले होते, व त्याच्या बरगड्या तळतळत होत्या.' [२२]

दोन खणी खुराडी, पोटावर थापट्या मारणारी पंगू माणसे, हास्याची हिरकणी, दातृत्वाची उर्मी, मांजरपाठी पैरण, मनाला कळंजून टाकणारी छाया या सारखे संपन्न शब्दप्रयोग या ललित लेखात येतात. व ते चपखल बसलेले आहेत.

माटे मुंबईला आरामदायी जीवन घालविण्यासाठी जातात पण तिथेही त्यांच्या स्वभाव धर्माप्रमाणे त्यांना पंगू, आंधळी अशी उपेक्षित माणसेच भेटतात. ही सर्व दृश्ये पाहून माट्यांच्या मनाची विलक्षण कालवा कालव होते.

## ७.कशाचा संसार

ही तबा व मंजूळा या दोन नवरा बायकोच्या आयुष्याचे चित्रण करणारी कुटुंबकथा आहे.

### कथानक-

तीस बत्तीस वर्षांचा तबा नाकाडोळ्यांनी नीटस होता. त्याचे शरीर बांधेसूद होते. तो तरूण होता पण, कदान्नावर पोसला होता. गरिबीने त्याच्या तोंडावर एक तऱ्हेची उद्विग्नता पसरली होती. तबाची बायको मंजुळा, आई व स्वत: एवढाच त्याचा संसार होता. मंजुळा तबाला साजेशी होती. पंचवीस वर्षाची ही स्त्री सशक्त होती. तबा मंजुळा दोघेही कष्टकरी होते. तबा तिला पैसे राखून ठेवायला सांगायचा. संसारात तिने पैसे घालू नयेत असे त्याला वाटे. थोडेफार पैसे साठले की तबा येळा, गोठ, चाळ, जोडवी असे चांदीचे दागिने आणायचा. ज्या दिवशी तबाच्या घरी दागिना येई त्याच दिवशी मंजुळा तबासाठी एखादी रंगीत पैरण किंवा फेटा घेऊन येई. मंजुळा गरीब पण रसिक होती. तिची रसिकता नवऱ्यावरच्या प्रेमापोटी जन्मली होती. प्रपंचाचा खर्च नवरा करतो व आपली कमाई दागिन्यासाठी ठेवतो ही गोष्ट तिला मनापासून बरी वाटे. तबाच्या घरात एक कालवड व शेळी होती. त्याची म्हातारी आई त्याची निगा राखे. म्हातारीने अंगण स्वच्छ सारवून ठेवले होते. एका कोपऱ्यात पळसाचे झाड उभे होते.

एका रविवारी लेखकाची व तबाची गाठ पडली. त्यांच्या मनात तबाविषयी सहानुभूती निर्माण झाली. रात्रीच्या शाळेसाठी त्यांना जागा हवी होती म्हणून ते फिरत होते. तबाने त्यांचे अंगण त्यांना खुशीने दिले. मग तिथेच माटे मास्तरांची शाळा सुरू झाली. रात्रीच्या शाळेत तबा शिकू लागला. त्याला अक्षर ओळख झाली. तो वाचू लागला. त्याला सोपे रामायण वाचता येऊ लागले. एकमेकांच्या सहवासात गप्पा वाढल्या. विश्वास वाढला. तबाचे मन मोकळे होऊ लागले. तबा निर्व्यसनी होता. तो आदबशीर बोलायचा. तबा मनाने उदार व सरळ होता. तबा मजूरी करत होता पण कुठला तरी विचार त्याच्या मनात घर करून राहिला होता. लेखक एका रात्री शाळा संपवून चालले होते. तेवढ्यात तबा त्यांच्या बरोबर आला. तो त्यांना म्हणाला, ''मी मोलमजूरी करतो. बायकोही करते. मास्तर आमचा परपंच आम्ही करतो पण कशाचा प्रपंच? काम केल्याने खायला मिळते इतकेच. पण ते मिळविण्याच्या नादात प्रपंच हातचा जातो. माझ्या कारभारणीच्या संगतीत घालवायला मला वेळ नसतो. पहाटे साडेचार वाजता आम्ही उठतो.

बायको भाकरी तुकडा करते. साडेपाचच्या दरम्याने आम्ही बाहेर पडतो. अर्धा मैल चालल्यावर तिची माझी वाट निराळी. आम्हाला वाईट वाटते. पण करायचे काय? दिवसभर तिने तिकडे व मी इकडे रखडायचे. रात्री कामावरून आल्यावर साडे सातला घरी तिची गाठ पडायची. पुन्हा पहाट झाली की वेगळ्या दिशा. घरी बसून चालत नाही. खाडे होतात. काम सुटते म्हणून दररोज पोटाच्या मागे वणावणा करीत जावे लागते. म्हणून आम्हा दोघांना गावात एका ठिकाणी कुठेतरी काम गाठून द्या.'' पहाटेचा अंधार असताना बकाल वस्तीतून मंजुळाला कामावर जावे लागते. याचे तबाला दु:ख वाटत होते. तबाच्या इच्छेप्रमाणे गावातच एके ठिकाणी दोघांना काम मिळाले. कामाचे ठिकाण घराच्या जवळच होते. सकाळी आठला घरातून निघून संध्याकाळी सहाला ते घरी पोहचत. पूर्वीच्या नोकऱ्यांच्या मानाने ह्या नोकऱ्या त्यांना सुसह्य झाल्या होत्या. त्या दोघांना एकमेकांचा सहवास पूर्वीपेक्षा खूप वेळ मिळू लागला. रात्रीच्या शाळेकडे तबाचे लक्ष आता जास्त लागू लागले. आता त्यांच्या जीवनामध्ये विशेष प्रकारची तकाकी येऊ लागली.

त्यानंतर बरेच महिने गेले. एका चांदण्यारात्री तबा व मंजुळा माटे मास्तरांना पोचविण्यासाठी पुढे गेले. तबा मास्तरांना सांगू लागला,''कारभारणीला दिवस गेलेत. आता इमारतीचे काम तिसऱ्या मजल्यावर गेले आहे. आता मंजुळाला कष्टाचे काम जमत नाही.''

सध्या तबाचे घर आनंदाने ओसंडून वहात आहे. एवढे मोठे अंगण भैरूला रांगताना कमी पडते. भैरूला म्हातारीचा लळा जास्त आहे. नातवाचे सुख चाखून म्हातारी मरण पावली. तबाच्या घराला पळसाचे रूप कायम राहिले. पण वठलेले पान गळले व नवे रसरशीत पान आले.

## व्यक्तिचित्रे-

**तबा-** तबा हे या कथेतले प्रमुख व्यक्तिचित्र आहे. 'तबा निर्व्यसनी आहे. तो दारूला शिवलासुध्दा नव्हता. फार काय सांगावे, विडीकाडीसुध्दा त्याने कधी हातात घेतली नव्हती. नाही म्हणायला एखाद्या वेळी चुन्यातंबाखुची चिमुट मात्र तो बाजुला तोंड करून घेई. वाणीचा आदबशीर, मनाने सरळ आणि दिलाचा उदार असा हा गृहस्थ केवळ जन्माच्या मुद्यावर बाजूला पडला होता. 'त्याच्या मळकट पैरणीच्या आड स्वच्छ अंत:करणाची भलाई नांदत होती, आणि डोक्यास गुंडाळलेल्या त्यांच्या भोंगळ मुंडाशाखाली समंजस बुध्दी, ऋजुता वागत होती.' [२३]

तबा परिस्थितीने गरीब असला तरी वृत्तीने रसिक आहे. आपल्या गरिबीच्या परिस्थितीतही तो ती जपतो. मंजुळाचा साठलेला पैसा भाकरी तुकड्यात न घालता त्याचे तिला दागिने केले होते.

शिक्षणाविषयी त्याला आस्था आहे. आपल्याच अंगणात शाळा सुरु करण्याला तो चटकन संमती देतो. श्रीगणेशाय नम: पासून शिकून चार चौघात रामायण वाचण्यापर्यंतचा शिक्षणाचा आनंद अनुभवतो. मास्तर हे त्याचे आदराचे व विश्वासाचे स्थान बनते. आपले सर्व गाऱ्हाणे तो मास्तरांना सांगतो. भाकरी तुकड्याच्या मागे लागल्याने व कामाची गैरसोय असल्याने कशाचा संसार या भावनेने तो उद्विग्न होतो. पण मास्तर त्याच्या कुटुंबातील एक व्यक्ती बनून त्याच्या घरात आनंदाचे वातावरण निर्माण करतात.

असा हा कष्टकरी तबा वृत्तीने शांत, रसिक मनाने सरळ आहे.

**मंजुळा-** मंजुळा हे या कथेतले दुसरे पात्र. 'ती आपली तबाला साजेशी होती. त्याच्या बरोबरीने उंच, सडक आणि सशक्त अशी ही पंचवीस वर्षाच्या वयाची स्त्री तबाचा संसार मोठ्या दक्षतेने करी.' [२४]

आपल्या कष्टाचे पैसे किडूक मिडूकासाठी ठेवले जातात याची तिला जाण आहे. तिचा नवऱ्यावर जीव आहे. तिला ज्या दिवशी दागिना मिळतो, त्यादिवशी ती त्याच्यासाठी रंगीत पैरण, नाहीतर फेटा घेऊन येते. मंजुळा गरीब असली तरी रसिक आहे.

ओढगस्तीच्या परिस्थितीत कामाला जाऊनसुध्दा संसार सुखाचा करण्यासाठी तिची चाललेली धडपड पाहून माट्यांनाही तिच्याबद्दल आपुलकी वाटते.

अशी ही कष्टाळू वृत्तीची रसिक स्त्री आहे.

**मास्तर-** लेखकाने फक्त त्रयस्थपणे कथा लिहायची असते. तिथे स्वत:चे व्यक्तिमत्व कुठे प्रत्यक्ष प्रकट करायचे नसते. पण माट्यांच्या लेखणीला हे मान्य नाही.

मीच्या रूपाने इथे माट्यांचा वावर जाणवतो. हा समाज शिक्षणानेच सुधारेल ही त्यांची ठाम श्रध्दा आहे. दोन विद्यार्थी बरोबर घेऊन ते शाळा काढण्याच्या उद्देशाने तबाच्या अंगणात येतात. तिथेच शाळा काढून तबाला चारचौघात रामायण वाचता यावे एवढे शिक्षण देतात.

वास्तविक हा समाज अस्पृश्य! यांना काय माहित त्या कालखंडात रामायण अन् श्रीगणेशा? पण माटे हे शब्द इथे जाणिवपूर्वक वापरतात. या समाजाबद्दल मास्तरांना विलक्षण कणव आहे. मास्तरांच्या रूपाने ते त्यांना शक्य ती सर्व मदत करतात. दोघांना एकत्र काम बघून देतात, गरोदर मंजूळेला तळमजल्यावरचे काम शोधून देतात.

ही माणसे सुखी व्हावीत यासाठीच त्यांची ही सर्व धडपड आहे. तबाच्या घरातला आनंदी आनंद बघून माटेदेखील सुखी होतात.

## वातावरण-

या कथेला कौटुंबिक वातावरणाची पार्श्वभूमी आहे. कथेच्या प्रारंभी तबाच्या संसारात निराशेचे वातावरण आहे. ही माणसे गरीब आहेत पण वृत्तीने रसिक आहेत. मोलमजुरी करून चरितार्थ चालवतात. रोज पोटाच्या मागे वणावणा करीत फिरत राहिल्याने त्यांना एकमेकांसाठी वेळ देता येत नाही. कशाचा संसार? असे तबाच्या मनाला वारंवार वाटते. दिवस केव्हा उगवतो नी केव्हा मावळतो हे त्यांना समजतसुध्दा नाही.

पहाटे उठून शहरच्या दोन टोकांना जाऊन त्यांना कामे करवी लागतात. दिवसभर वेगळेपणा मनात धास्ती. पण कथेच्या शेवटी तबाचे घर आनंदाच्या चांदण्याने उजळून निघाले आहे. इथल्या वातावरणातील उत्साह आणि उल्हास लक्षणीय आहे. तबाच्या आणि मंजुळाच्या खुरटलेल्या संसाराला फुटलेले हर्षाचे धुमारे वाचकाच्या मनाला सुखावून जातात.

## संवाद-

या कथेतले संवाद सातारी बोलीतले आहेत.

''पन तुमच्या पायाच्यान् सांगतो, परमेश्वरानं येवढा राग का केलाया माझ्यावर? सांचीपारानं घरला परत फिरलो मंजी सडकनं येताना तुमच्याकडची बायामाणसं अन् बापई फिरायला निगालेली दिसत्यात; ती खुषीनं गोष्टी करत्यात, हसत्यात, हवा खात्यात. तवा माज्या मनात येतं की, आमचं जिनं बगा काय मातीच्या मोलाचं ! देवा, चांडाळा, असं का केलंस !'' [२५]

कथेतले निवेदन नागर भाषेत आहे पण तबाचे संवाद मात्र बोली भाषेतीलच आहेत. त्यामुळे कथा जिवंत झाली आहे.

## रसग्रहण-

'कशाचा संसार?' ही एक करूण कथा आहे. कारण प्रेमी माणूस आपल्याला नाही म्हणून पुष्कळ लोक खिन्न असतात. पण प्रेमी माणूस असून प्रेम करावयास वेळ नाही अशी सहस्त्रावधी लोकांची स्थिती झालेली असते. पोटाच्या मागे लागल्याने पत्नीच्या प्रेमळ सहवासालाही तबा अंतरतो. ही या कथेतली व्यथा आहे.

तबा व मंजुळा दोघेही काम करतात. पण शहराच्या दोन टोकांना. त्यामुळे या तरूण पतीपत्नींना एकमेकांच्या सहवासात फार कमी वेळ रहायला मिळते. म्हणून तबा म्हणतो कशाचा संसार? गरीब मजुरांच्या प्रपंचातील संसारपण त्यामुळे हरवून जाते. ती कष्ट करणारी यंत्रे बनतात. त्यांना थोडा वेळ मिळावा अशी त्यांची रास्त अपेक्षा आहे. या रूक्ष जीवनात प्रेमाचा हिरवेपणा

यायचा असेल तर त्यांना त्यांच्या संसारात वेळ मिळाला पाहिजे. असा या कथेचा भावार्थ आहे. तशी थोडीफार मोकळीक त्यांना मिळाली की मग त्यांचा संसार प्रेमभराने आणि चैतन्याने बहरतो व त्यांना जगण्यात आनंद वाटतो. हा या कथेचा मतितार्थ माटे यांनी सूक्ष्मपणे व्यक्त केला आहे.

समाजात वावरताना विशेषत: श्रमिकांच्या समाजात वावरताना माट्यांना पहायला मिळालेली ही दु:खे आहेत. हे अनुभव त्यांचे स्वत:चे आहेत. त्या अनुभवावर ही कथा आधारलेली आहे. या कथेतून माट्यांची समाजमनस्कता दिसून येते. कष्टकऱ्यांच्या जीवनाकडे माट्यांचे किती बारकाईने लक्ष होते त्याचा अनुभव ही कथा देते. या साध्याभोळ्या तबाबद्दल लेखकाच्या मनात आदर निर्माण झालेला आहे. कारण तबा अडाणी असला तरी तो सुसंस्कृत आहे. अशा माणसाला संसार कंटाळवाणा वाटावा हे माट्यांच्या समाजहितैषी मनाला पाहवत नाही. त्याचाच हा कथारूप आविष्कार होय.

## ८.सावित्री मुक्यानेच मेली

वासुदेव बळवंत फडके यांच्या बंडाची पार्श्वभूमी असणारी पण सावित्रीच्या मनाची उलाघाल प्रकट करणारी ही करूणरसरम्य कथा आहे.

### कथानक-

पद्माकराला अटक झाली. पुण्यास चालू असलेला खटला पुराव्याअभावी पुढे ढकलला. तुरूंगात पद्माकराची गाठ पडणार नाही व धार्मिक कोणतेही कार्य करता येणार नाही म्हणून नानाशास्त्री गावी परतले. गावी आले ते कोणाशीही न बोलता अंघोळ आटपून पूजेला बसले. पूजेत लक्ष नाही. जेवायला बसतात तो डोळ्यातून पाणी. तिथं पद्माकराला काय देत असतील याची त्यांना काळजी वाटते.

आपण गरीब माणसं, पद्माकरासारख्या बुध्दिमान, सद्‌गुणी मुलाने स्वातंत्र्य चळवळीत भाग घेणाऱ्या वासुदेव बळवंतांच्या धाडसी, दरोड्याच्या कृत्यात पडू नये असे त्यांना वाटत होते. त्यांच्या सात्विक मनाला ते भावत नव्हते. शास्त्राभ्यासासाठी त्याला काशीस ठेवण्याचा नानांचा मानस होता. पण पद्माकराच्या मनात काही निराळेच होते. नानांना या गोष्टीचे दु:ख होते.

खटल्याची तारीख कळली. पद्माकर सुटणे अशक्य होते. नानांनी सर्वांनाच बरोबर न्यावयाचे ठरविले. सावित्री त्याच वेळी ऋतुमती होते. आपले नशीब खोटे असे तिला वाटते. तिला घरी ठेऊन सर्व मंडळी पुण्याला जातात. पद्माकराला आई वडिलांना भेटू दिले जाते. पद्माकराची शोधक नजर सावित्रीला पहात असते. पण ती त्याला भेटत नाही. पद्माकराला जन्मठेप काळ्या

पाण्याची शिक्षा होते.

पद्माकर परत येईल, भिऊ नको अशी सुनबाईंची समजावणी करीत नाना व सत्यभामाबाईंनी अन्न सोडले. सासु सासरे म्हणजे सावित्रीखे आई बाप िहेते. राम तिचा धाकटा दीर होता. तो तिला भाऊच होता. रामला सावित्रीच्या हाती सोपवून सत्यभामाबाईंच्या दहावे दिवशी नानांनी देह ठेवला. रामा व सावित्री पोरकी झाली.

नानांनी महिन्याची तीस पस्तीस रूपयाची तरतूद करून ठेवली होती. चित्रबोधाच्या आधारे सावित्री मुळाक्षरे वाचू लागली. रामाला पाठ असलेले रूपावली समासचक्र तिला ऐकून पाठ झाले. चैत्रात पाच सुवासिनींना बोलावून ती हळदीकुंकु करी. घरातले पूराण ग्रंथ रामविजय, हरिविजय यासारखे ग्रंथ ती सहज वाचू लागली. पुराणाच अर्जूनाचा उल्लेख येताच तिचा अर्जून तिला आठवे. ''बारा वर्षांचा वनवास संपतो तसा वीस वर्षाचा नाही का हो संपणार !'' [२६] असे ती मैत्रिणींना विचारी. पोक्त स्त्रिया तिची समजूत काढीत व तिच्या शहाणपणाचे कौतुक करीत.

सकाळी उठून घर झाडणे, फुले आणणे व रामाबरोबर गंगास्नान करून येणे असा तिचा नेम होता. येता जाता सावित्रीची नजर करडी होती. धैर्यवंत नवऱ्याचा दबदबा सर्वत्र होता. चित्रात पद्माकराचा जप, तोंडात रामचरित्राची स्त्रोत्रे आणि व्यवहारात कडकडीत सरळपणा हे सावित्रीचे कवच होते. सावित्रीचे साध्वीपणाचे वर्तन पाहून टारगट पोरेही तिच्या वाटेला येत नसत. ती निर्भय होती.

रामाची निगा हा तिचा ध्यास होता. सावित्री सौभाग्यवती पण कुमारी आई होती. आई, बाप, भाऊ, बहिण आपणच रामाचे सर्व आहोत असे समजून ती त्याचे सर्व करी. 'दादा परत येईल तेव्हा मी किती वर्षाचा असेन या त्याच्या प्रश्नांवरून तिच्या चित्तवृत्ती उल्हसित होत. रामाच्या वागण्यातील उत्साहामुळे पद्माकर लवकर परत येईल असा आभास उत्पन्न होत असे.

एक दिवस पद्माकराचे पत्र येते. 'मनी वसे ते स्वप्नी दिसे' पत्रातील अक्षर व शेवटची स्वाक्षरी पाहून सावित्रीच्या चित्तवृत्ती पल्लवीत झाल्या. पद्माकरालाही सावित्रीचे स्मरण होत असे. सावित्रीला कोणी हिणवले तर आपण देशाभिमानी आहोत असे उत्तर देण्यास तो पत्रातून सांगतो. अंदमानची हवा, अन्न, माणसे सावित्रीच्या आठवणीने तो गोड करून घेत असे. पत्र आलेल्या दिवशी सावित्री खुश असे. पत्रातल्या भावना दु:खप्रद असल्या तरी घरात गोड भावनांचा संचार होत असे.

पद्मामराचे पत्र मधून मधून येत असे. सावित्रीला आपण पत्नी म्हणून एकदाही वागणूक दिली नाही. घरातले वातावरण, कृष्णाकाठचा वारा, घरची आदबशीर वागणूक इ. सर्वांची त्याला होत असलेली आठवण यांचा उल्लेख पत्रातून होत असे. 'रामाला सांभाळ!' हे मात्र तो

आवर्जुन लिहित असे. ज्या दिवशी पद्माकराचे पत्र येई त्या दिवशी ती व्यंकटेश स्तोत्राची पारायणे करी. घरी चार सुवासिनी बोलवून गरिबांना अन्नदान करी.

सावित्री व रामही त्याला पत्र लिहित. घरचा सर्व वृत्तांत त्यातून पद्माकराला कळत असे. आपले केस वाढले आहेत, ते पिकले आहेत, डोळ्यात उन्हाने फुल पडले आहे, अलीकडे आपल्याला वरचेवर बरे नसते, अशा अर्थाचे नवऱ्याचे पत्र आले तरी सावित्री क्षमाशील आहे. ती लिहिते,'तिथे कसलाही विरंगुळा नाही, कसलंही सुख नाही, कुणाची माया नाही, यामुळं चुका होतात, पण इकडची मुळची वृत्ती तशी नाही, हे मला पक्क ठाऊक आहे.'' [२७]

'सहा महिन्यांनी येतो' हे पद्माकराचे पत्र येताच सावित्रीच्या वागण्यात बदल झाला. ती सुखावली. तिने फुलझाडांना पाणी घातले, घरचे सारवण करून भिंतींना नवा रंग दिला. पण अंदमानचा कैदी प्रथम मुंबईला आणतात. सावित्रीचा मामेभाऊ थत्तेशास्त्री यांचे पत्र आले. पद्माकरपंत पुण्यावरूनच तिकडे येतील. शंकराच्या देवळात काही धर्मकार्य करून घरी परतावे. त्याप्रमाणे सावित्री पुण्यास जायला निघाली. सौभाग्याची सर्व चिन्हे तिने धारण केली होती. थत्तेशास्त्र्यांच्या पत्राने तिला पुण्याला ओढून नेले. पुण्याची हवा बिघडली होती. थत्तेशास्त्र्यांच्या बाजूला काही नव्हते. पण सावित्री प्लेगची शिकार बनली. मृत्यू कोणाचीच वाट पहात नाही. पद्माकराची भेट व्हायच्या आत सावित्रीने शेवटचा आचका दिला.

ओंकारेश्वराच्या देवळाजवळ त्यांची गाठ पडली पण काहीच उपयोग नव्हता. पद्माकर तिला अग्नी देताना म्हणाला,''....सावित्री एक शब्द जरी माझ्याशी बोलली असतीस तरी वीस वर्षांच माझं दु:ख गेलं असतं. सगळ्या जन्मात तू अन् मी एकदाही प्रेमळपणाने बोललो नाही, कारण नशीबानंच आपली उपेक्षा केली!'' [२८]

## व्यक्तिचित्रे-

सावित्री- हे या कथेतील प्रमुख पात्र आहे. वयाने ती अठरा वर्षांची आहे. इतक्या लहान वयात पद्माकराशी तिचे लग्न झाले आहे. ही स्त्री धार्मिक वृत्तीची व सासुसासऱ्यांशी अत्यंत प्रेमळपणाने राहणारी आहे.

नवऱ्यावर तिचे निरतिशय प्रेम आहे. पण लग्नानंतर त्या दोहोंची गाठ पडायच्या आत तो तुरूंगात जातो. तिथून सावित्रीचे जीवन एकाकी बनते. माहेरचे विशेष कुणी नसल्याने सासुसासरे हेच तिचे आईबाप आहेत. पद्माकरच्या शिक्षेची वार्ता ऐकताच सासु सासरे निधन पावतात. तेथून ती पोरकी बनते. सासुसासऱ्यांच्या पश्चात घरची सर्व जबाबदारी ती व्यवस्थित पार पाडते.

चित्रबोधाच्या आधारे मुळाक्षरे वाचून रामविजय, हरिविजय यासारखे ग्रंथ वाचण्यापर्यंत ती प्रगती करते. वृत्तीने धार्मिक असलेली सावित्री घरीच पुराण वाचन सुरू करते. हळदी कुंकु,

गंगास्नान अन् तिचे रोजचे देवाला जाणे या वरून ही स्त्री श्रध्दाळू आहे हे लक्षात येते.

तिच्या ठायी वात्सल्य आहे. ती सौभाग्यवती पण कुमारी आई बनते. आई, बाप, भाऊ मीच रामचे सर्व आहे या भावनेने सावित्रीचे मन सतत भारलेले आहे. रामाच्या खाण्यापिण्याकडे व्यायामाकडे लक्ष देऊन दहा वर्षाच्या रामला ती त्याच्या डेहराडूनच्या शिक्षणापर्यंत योग्य ते सर्व करते त्याचं हवं नको पाहते.

माट्यांनी या कथेत ती एक लग्न झालेली स्त्री आहे इथपासून नवऱ्याच्या भेटीपर्यंतचा तिचा भावनिक आलेख चढता ठेऊन शेवट शोकपर्यावसायी केला आहे. सर्व कथेत तिचा भावनिक कोंडमारा होतो आहे. तरीही ती मोठ्या धीराची आहे. पद्माकराचे एखादे पत्र जरी आले तरी तिच्या चित्तवृत्ती उल्हसित होतात. पद्माकराची पत्रं हा या कथेतील हृदय व बोलका भाग आहे. ज्या दिवशी त्याचे पत्र येईल त्या दिवशी ती चार सुवासिनी बोलावून गरिबांना अन्नदान करते. व्यंकटेश स्त्रोत्राची पारायणे करते. पद्माकराची कांती अणुरेणूत भरल्यासारखे तिला वाटते. पद्माकराच्या पत्रामुळं सावित्री, रामा, पद्माकर हे जोडले जातात.

'सावित्रीच्या अंगावर मंगळसूत्राखेरीज फुटका मणीही कोणी कधीही पाहिला नाही, आणि साध्या सुतड्याशिवाय दुसरी लुगडीही ती कधी नेसली नाही. तिला सृष्टीनेच आपल्या हाताने नटविले होते.'' [२१] आपल्या नवऱ्याच्या पत्राची ती आतूरतेने वाट पाहते. शेवटी पद्माकराच्या येण्याचा दिवस येतो. भेट पुण्याला थत्तेशास्त्र्यांच्या घरी होणार असते. वर्षानुवर्षे नवऱ्याच्या प्रेमाला आसुसलेली ही स्त्री खणानारळाची ओटी घेऊन पुण्याला भेटायला जाते.

पण नियतीने वेगळेच ठरविले आहे. तिथे जाऊन ती प्लेगची शिकार बनते. मोठ्या आतूरतेने गेलेली ही स्त्री नवऱ्याची भेट न होताच इहलोकीची यात्रा संपविते. माटे यांनी या मृत्यूच्या प्रसंगातील कारूण्य वेधक भाषाशैलीने अधिकच गहिरे केले आहे. सावित्रीच्या ओठापर्यंतचा अमृताचा प्याला काळाने हरवून नेला व ती दुर्दैवी ठरली.

एकूण कथेत सावित्रीचा दैवदुर्विलास चित्रीत करून शोकपर्यावसायी शेवट केला आहे.

पद्माकर- हे या कथेतील दुसरे पात्र आहे. पद्माकर चांगला बुद्धिमान, सद्गुणी आणि सशक्त आहे. घरच्या विद्येतही तो प्रविण आहे. शास्त्राभ्यासासाठी काशीस ठेवण्याचा घरातल्यांचा मानस आहे. पण नियतीच्या मनात काही निराळेच आहे.

सर्व महाराष्ट्रभर पसरणाऱ्या वासुदेव बळवंतांच्या चलाखीच्या धाडसाच्या व दरोड्याच्या हकीकतीतून त्याच्या मनावर परिणाम होतो. पद्माकर रामोशांचे पुढारीपण करून दरोड्यात सामील होतो. पोलीसांद्वारे पकडला जातो. त्याच्यावर खटला भरला जातो व त्याला वीस वर्षे जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा होते.

पद्माकर कुटुंबवत्सल आहे. त्याचे आपल्या आई वडिलांवर व धाकट्या भावावर प्रेम आहे. तो त्याचा कलिजा आहे. अंदमानमधून सावित्रीला आलेल्या प्रत्येक पत्रात त्याला नीट सांभाळ हे वाक्य आहेच. नव्यानेच लग्न झालेल्या पद्माकराची व सावित्रीची भेट झालेली नाही. त्याच्याही मनाची तगमग पत्रातून व्यक्त होते. आपण देशभक्त आहोत याचा त्याला अभिमान आहे. आपली पत्नी सती मोहराने डवरलेल्या आम्रवृक्षासारखी आहे. याची त्याला जाणीव आहे. तिच्या प्रीतीच्या रसाने जिवंत राहण्याची त्याची मनीषा आहे.

त्याची वीस वर्षाची शिक्षा संपते व तो परत येतो. पण त्या अगोदरच सावित्री प्लेगने मृत झालेली असते. तो गुराप्रमाणे हंबरडा फोडून जमिनीवर कोसळतो. सावित्रीवर निरतिशय प्रेम करणाऱ्या पद्माकराची नियतीने उपेक्षा केली आहे. तो उद्गारतो, 'सती ए सावित्री सती ! ए माझे सावित्री सती, तू माझी अन् मी तुझा आहे. आता नसली तरी माझी कुठं तरी गाठ पडेल.'' [२८] असे करूणपूर्ण उद्गार त्याच्या तोंडून बाहेर पडतात. सावित्रीबद्दलच्या त्याच्या भावना किती टोकदार आहेत हे या उद्गारावरून कळते. हे त्याचे मनोगत भावलेला आवाहन करणारे आहे. सहृदय वाचकाला मनाला पाझर फोडणारे आहे. त्याच्या या भाषाणात कारूण्य परमोत्कर्ष पदाला पोहचते.

राम- पद्माकराचा भाऊ. दहा बारा वर्षांचा आहे. शाळेत मोठा चलाख आहे व हजरजबाबी आहे. पद्माकरवर त्याचेही प्रेम आहे. त्याचे पत्र येताच 'दादाचे पत्र दादाचे पत्र' म्हणून तो नाचतो. 'त्या आंबलेल्या वृध्देला-मावशीलासुध्दा त्याने ही बातमी ओरडून सांगितली.' या वाक्यावरून त्याची भावना स्पष्ट होते. सावित्री आपल्या मुलाप्रमाणे त्याचे सर्व करते. 'मीच त्याचे सर्व करते' या विचाराने ती सतत भारलेली आहे.

नानाशास्त्री अथवा विसूनाना- हे पद्माकराचे वडील. कृष्णास्नान अथर्वशीर्षाची आवर्तने अशा धार्मिक वातावरणात रमणारा हा मनुष्य आहे. मुलावर त्याचे अपरंपार प्रेम आहे.

याखेरीज पद्माकराची आई सत्यभामाबाई याही सत्प्रवृत्त व धार्मिक वृत्तीच्या आहेत.

## वातावरण-

या कथेतील वातावरण दोन प्रकारचे आहे. एक धार्मिक व दुसरे तुरूंग कोर्ट खटला अशा प्रकारचे.

ही सर्व कथा एका ब्राह्मण कुटुंबात घडते. कृष्णास्नान अथर्वशीर्षाची आवर्तने, आन्हिक, पंचायतनाची पूजा हे सर्व धार्मिक वातावरण तत्कालीन परिस्थितीची ओळख करून देते. मुलाने

शास्त्राभ्यास वगैरेत रमावे अशी नानांची देखील इच्छा आहे.

पुराण श्रवण, हरिविजय, रामविजय या सारख्या ग्रंथांची पारायणे, सुवासिनींचा हळदी कुंकू कार्यक्रम, खण नारळाची ओटी हे सर्व अहेवपणाचे संकेत तत्कालिन स्त्रिया पाळताना दिसतात. एकूण सार्वजनिक जीवनही धार्मिक संस्कारानी भारलेले आहे.

यापेक्षा वेगळी पार्श्वभूमी म्हणजे वासुदेव बळवंतांच्या धाडसी हालचाली, स्वातंत्र्य मिळविण्यासाठीचे प्रयत्न. सर्व महाराष्ट्रभर वासुदेव बळवंतांच्या चलाखीच्या धाडसाच्या हकीकती पसरल्या होत्या. या पार्श्वभूमीवर माट्यांनी ही कथा लिहिली आहे.

## भाषाशैली-

पद्माकराचे सावित्रीला पाहताच शेवटचे उद्‌गार उत्कृष्ट भाषाशैलीचा नमुना आहेत. तो म्हणाला, ''भटजी, कसला मंत्र म्हणता ! त्यात काय आहे ! सावित्रीला त्यातले काही कळायचे नाही. माझा मंत्र ऐका, 'सती, ए सावित्री सती ! ए माझे सावित्री सती, तू माझी अन् मी तुझा आहे. आत्ता नसली तरी माझी कुठं तरी गाठ पडेल. जीव कसाबसा धरून मी इकडे आलो ! तू वाट पाहून कंटाळलीस का? अग सावित्री, तू पवित्र, मी अपवित्र. माझ्या स्पर्शाने तुझा देह बाटला असता ना? तुला नमस्कार करतो. तू जा पण माझ्या या जीर्ण हृदयात तुझी वसती कायमची आहे ! सावित्री माझ्याशी एक शब्द जरी बोलली असतीस तर वीस वर्षांचं माझं दु:ख गेलं असतं. सगळ्या जन्मात तू अन् मी एकदाही प्रेमळपणानं बोललो नाही, कारण नशिबानंच आपली उपेक्षा केली !'' [२८]

या कथेत शेवटचे वातावरण करूणरम्य झाले आहे. वंचित प्रणयाचे हृदयस्पर्शी चित्रण या कथेत केले आहे. सावित्रीचा त्याग, सर्व निष्ठा वांझोटी ठरते. ही सावित्री सुरवातीला कोमेजली आहे. सहा महिन्यांनी येतो असे पद्माकराचे पत्र येते तेव्हा ती बहरते. माट्यांनी पत्रांचा उपयोग मार्मिक व चपखलपणे करून घेतला आहे. पात्रांमुळे कथेत विलक्षण जीवंतपणा येतो. पुढच्या आठवड्यात ती त्याला भेटणार आहे. हा तिच्या बहरण्याचा उत्कर्षकाळ आहे. त्यानंतर तिला जो प्लेग होतो. तिथे कारूण्य एकवटलेले आहे. ती दूर्दैवी ठरते. कथेतील शेवटचा प्रसंग हृदयद्रावक व करूणरसपूर्ण होतो व त्यातील उत्कटता उत्तरोत्तर वाढत जाते ही माट्यांची श्रेष्ठ व यशस्वी कथा वाचकांच्या मनात घर करून राहते.

एकूण ही कथा उत्कट आहे. पण कथेत मध्येच येणारे गावातले वातावरण व ऐदी पोशांचे वागणे नाही वर्णन केले तरी चालले असते. कथानकाच्या दृष्टीने याचा सांधा कुठेही जोडलेला दिसत नाही.

## ९.श्रीनिवासरावांची गोड निराशा

### कथानक-

श्रीनिवासराव कनवाळू होते. श्रीनिवासरावांच्या मनात नेहमी दु:खी कष्टी लोकांविषयी विचार चालू असायचे. 'मुकी बिचारी कुणी हाका' अशी गरीब लोकांकडून कष्ट करून घेण्याची आपली प्रवृत्ती असते. याची दोन तीन उदाहरणे ते देतात. टांगा सामान नेण्यासाठी आणला की सामान टांगेवाल्याने ठेवावे असे आपल्याला वाटते. आपण स्वत: टांग्यात सामान ठेवायचे ठरविले तर तो स्वत: आपल्याला मदत करील.

आपण लाकडे आणायला जातो. डोक्यावरून लाकडे आणणे एवढेच हमालाचे काम. पण लाकडे काढणे, वजनात ठेवणे, मोळी करणे ही सर्व कामे वखारवाला त्याच्याकडून करून घेतो. आपण इतके प्रपंच्याच्या आधीन झालेलो असतो की आपण अन्याय करीत आहोत असे आपणाला वाटत नाही. इमारतीच्या बांधकामावरही हीच अवस्था असते. कामावरची राहिलेली लाकडे बायांच्या डोक्यावर देऊन त्यांना घरी पाठविले जाते त्यांना दिलेला पत्ता देखील अपूरा असतो. या गोष्टीचा श्रीनिवासरावांना संताप येतो. पोटाच्या खळगीसाठी ही माणसे देखील वाट्टेल ते करून शरीर राबवतात ही त्यांची मजबूरी असते. अशा गरीब लोकांची चौकशी करण्याची श्रीनिवासरावांना सवय आहे.

रावांचे मंडईत जाणे हा एक समारंभ असतो. प्रपंचाची हौस म्हणून ते मंडईत जातात. बऱ्याच वस्तू खरेदी करण्याची त्यांना हौस आहे. पिशवी, झोळी काहीच बरोबर न नेता एखाद्या हेलकरणीकडे सामान द्यावे यात त्यांना मोठेपणा वाटतो.

मंडईत एकदा श्रीनिवासरावांनी आणेलीच्या ऐवजी पावली माळणीला दिली. हेलकरणींने रावांच्या हे लक्षात आणून दिले. माळीणही प्रामाणिक होती. तिने ती परत दिली. हेलकरणीनेही प्रामाणिकपणाने श्रीनिवासरावांचे मन जिंकले. जरा पुढे जाताच हेलकरणीने आपले नाव कोयना असल्याचे सांगितले. मस्तक ताठ अन् दोन बाहू बळकट असणारी ओझ्याची फिकीर न करणारी कोयना भुईमुगाच्या शेंगाचा गुडघ्या इतका भारा शेतावरून रोज आणते.

दोन मुले अन् एक मुलगा असणारी ही स्त्री 'भोर'कडची आहे. शेती, बैल गावाकडे असणारी ही स्त्री पाऊस पाणी नाही तो पर्यंत काम करण्यासाठी पुणे शहरात आली आहे. गावाकडे घर व शेती बघणारा तिचा नवरा सावकारी पाशात अडकलेला आहे. कसे तरी ओले सुके खाऊन, मिठ घालून तांदूळ उकडून खावून ती आपला उदरनिर्वाह चालवते. घरात काम करणारी तिची सासू आहे. थोडा पाऊस पडला की घराकडे जाण्याचा तिचा मानस आहे.

घर येताच तिच्या मजुरीच्या पैशाखेरीज तिला चार आणे श्रीनिवासराव जास्त देतात. तुझ्या मुलाला आपण ते दिले असे सांगताच ती त्याचा स्वीकार करते आणि मागे न पाहता तरातरा निघून जाते.

## व्यक्तिचित्रे-

**कोयनाबाई-** कोयनाबाई हे या कथेतील प्रमुख व्यक्तिचित्र आहे. माट्यांनी तिचे शब्दचित्र अगदी हुबेहूब रेखाटले आहे.

'कोयना सरासरी तीस एक वर्षाची असावी. तिच्या अंगावरचे सुडके दोन लुगड्यांच्या दोन धडप्यांचे दंड घालून तयार केलेले होते, आणि चोळी कोपऱ्याच्याही खाली असली तरी ती आतल्या अंगाला दंडावर गेलेली होती. तिच्या गळ्यात हिरव्या काचमण्यांची गळ्यासरशी राहाणारी एक एकदाणी होती आणि तीत असलेले एक पिवळे फोलकट सोन्याचे का पितळेचे हे सोनारालाच माहित ! हीच कोयनेची वेषभूषा आणि हीच कोयनेची दागिन्यांची धन ! पण असल्या मलिन, तोटक्या आणि जीर्ण वस्त्रात वेढलेला आणि लंकेच्या पार्वतीप्रमाणे गळा, हात यात ओका ओका आणि खंक दिसणारा तिचा देह मात्र सुदृढ दिसत होता. लुगडे रूंद असले तरी खंक दिसणारा तिचा देह मात्र सुदृढ दिसत होता. लुगडे रूंद असले तरी जलद गतीला अडथळा करणारे म्हणून ते गुढघ्यापर्यंत राहिल असा ओचा तिने खोचला होता. पायात अर्थातच काही नव्हते. डोक्यावर ओझे घेऊन अर्धवट पळत जाण्याच्या सरावामुळे तिचे पाय घट्ट आणि पिळदार झालेले होते. केसातून पुन्हा पुन्हा ओघळणारा घाम निरपण्याचे काम या नाही तर त्या हाताने सारखे चालले होते. तिच्या कपाळाला कुंकुही नव्हते, कोयनेचा वर्ण मुळचा अगदीच काळा असेलसे दिसत नव्हते, पण श्रमांनी आणि उन्हातान्हात कष्ट करण्याने तिची कांती अगदी करपून गेलेली होती. असल्या दैन्यातही तिचा चेहरा मात्र दीनवाणा दिसत नव्हता आणि तिचा आवाज तर तडफदार आणि थोडा तुसडाही होता.'[३०]

कसे तरी पोट भरणारी ही कोयना वृत्तीने अतिशय प्रामाणिक आहे. आपण करू तेवढ्याच कष्टाचा मोबदला मिळावा ही तिची वृत्ती आहे. या पेक्षा जादा घ्यायला ती तयार होत नाही. भाजीवालीला न कळत जादा गेलेले श्रीनिवासरावांचे चार आणे कोयनाबाईमुळे वाचतात. पण ती भाजीवालीसुध्दा प्रामाणिक आहे, सच्ची आहे. तिच्यामुळे चार आणे वाचले म्हणून ते कोयनाबाईला चार आणे जादा देऊ पाहातात पण तिचा त्यावेळचा उद्‌गार तिच्या वृत्तीवर प्रकाश टाकतो. ''त्ये नगं काका मला !आक्रीताचं नगं मला !मालोचं दिलं त्येवड पुरं झालं.'' [३१]

परिस्थितीने गरीब असणारी ही माणसे प्रामाणिक व पैशाची लालूच नसणारी, स्वच्छ नितळ मनाची आहेत.

श्रीनिवासराव- श्रीनिवासरावांच्या प्रातिनिधिक रूपाने नागर संस्कृतीची ओळख या कथेत होते. नागर संस्कृतीतील इतर लोकांपेक्षा ते जरा वेगळे आहेत. त्यांना कष्टकऱ्यांविषयी कणव आहे. बाई माणूस श्रम करीत आहे याचे त्यांना मनापासून वाईट वाटते. आपण खुशाल चेंडूसारखे रस्त्याने चाललो आहोत या विचाराने ते अस्वस्थ होतात. ओझे बरेच झाले असले तर ते तिला वाटेत उतरायला हातभार लावायला देखील तयार होतात. तिला ते चार आणे देतात पण कोयना मागे न पाहताच जिन्यावरून उतरून जाते. समाधानाचे, जादा मोबदल्याचे हास्य न पहायला मिळाल्याने त्यांची निराशा होते. पण त्यांना ती गोड वाटते.

## वातावरण-

ही सर्व कथा वाटेवर आकार घेते. पुणे या शहरात घडलेली ही कथा आहे. कथेतील वातावरण साहजिकच शहरी आहे. पण कोयना ही स्त्री मात्र खेड्यातील आहे.

## भाषाशैली व संवाद-

कोयनेचे शब्दचित्र हुबेहुब रेखाटण्यात माटे यांची चित्रमयी शैली कमालीची यशस्वी झाली आहे.

"असं का म्हनता काका? कुणी असत्यात बी मुरदाड अन् अडीअडचणीला कोन उबं ऱ्हातंया? श्यात पिकतंया न पिकतंया, सावकाराचं द्येनं तर दिलचं पायजे; मग त्येच घर जाऊन उपसाया लागतंय; कवा बी जावावं अन् धा ईस, परसंगाला शंभर बी घेऊन यावावं; मग त्येनं काम सांगितलं तर कराइ नग?" [३२]

या उद्‌गारावरून हेलकऱ्यांच्या ग्रामीण बोलीचे व त्यांच्या परावलंबित्वाचे व अगतिकत्वाचे दर्शन घडते.

हेलकऱ्याच्या कष्टप्रद जीवनाबरोबरच त्यांच्या अंगी प्रामाणिकपणा हा गुणही लपलेला असतो. याचे चित्रण या कथेद्वारे केले आहे. माथ्यावरच्या ओझ्याप्रमाणे गरिबीचे ओझे ही ती हसतमुखाने तोलून धरते.

दुष्काळामुळे जीणे कठीण झालेली एक खेडूत स्त्री पुण्याला येऊन रोजगार करते आणि कुटुंबाचे पोट भरते. कोयना हे तिचे नाव. ती अडाणी आहे, श्रमिक आहे पण प्रामाणिक आहे. कष्टापेक्षा जास्त मजुरी तिला नको आहे. मजुर स्त्रीची ही सचोटी लक्षणीय आहे. या सचोटीचे दर्शन या कथेत माट्यांनी रमणीय रीतीने घडविले आहे.

# १०.एका अस्पृष्टाच्या डायरीतील पाने !

माटे यांनी विचारल्यावरून पिऱ्या महाराने एक दिवसाची हकीकत सांगितली. तीच इथे माट्यांनी शब्दबध्द केली आहे.

## कथानक-

हा ब्रिटीश आमदानीचा काळ आहे. त्यावेळी तालुक्याचे साहेब खेडेगावी मुक्कामी येत व दोन चार दिवस राहून तिथले सर्व खटले ते रात्री निकालात काढीत. रात्री नऊ पासून पहाटे तीन वाजेपर्यंत माणसांना बोलवायला पिऱ्याने गावात नऊ हेलपाटे घातले. पहाटे चार वाजता तो घरी जाऊन पडला, तेवढ्यात महंमदभाईंची दारावर थाप पडली. 'रात्रभर झोपलास आता बाहेर चल' असे महंमदभाई त्याला म्हणाले. पुढच्या गावाला साहेब जाणार होते त्याची वर्दी देण्याचे काम त्यांनी पिऱ्यावर सोपविले. पिऱ्याने मुजरा करून जातो म्हणून सांगितले. महंमदभाई आठच्या सुमारास म्हसोबाच्या वडाखाली थांबणार होता. त्याला पिऱ्याकडून झालेल्या कामाचा अहवाल पाहिजे होता. पिऱ्याने हे ओळखले की महंमदभाईलाच साहेबांनी पुढील गावाला वर्दी द्यायला सांगितले आहे. मग नाईक असलेले महंमदभाई पुढे निघून गेले. थोडे पुढे गेल्याचा देखावा करून पिऱ्या घरी परतला. सगळे विधी उरकले काही तरी खावून जाण्याचा बेत केला पण घरी काहीच नव्हते. पिऱ्या गेला व शेजारच्या गावच्या वेशीवर जाऊन त्याने येसकराला ओरडून साहेब येणार असल्याचे सांगितले.

पिऱ्या परत आला. महंमदभाईला पिऱ्याने वर्दी देऊन आल्याचे सांगितले. मग महंमदभाईंनी साहेबांना वर्दी दिल्याचे सांगितले. हेडक्लार्कनी भाईंना स्वयंपाकासाठी लाकडे पाहिजेत असे सांगितले. महंमदभाई पिऱ्याला घेऊन निघाले. एका जुन्या मोडलेल्या पडक्या घराजवळ महंमदभाई थांबले. तेवढ्यात पिऱ्या घरी निघून गेला होता. महंमदभाईला त्याचा राग आला. पिऱ्याच्या घरी येऊन तो दारावर लाथ मारू लागला. दार मोडून पडले. तो म्हणाला, ''साल्या, लाकडं काय तुज्या बानं फोडायची का?'' कुऱ्हाडीला धार काढायला पाहिजे होती. सुलतानजीकडून कुऱ्हाडं शेवटून आण असे महंमदभाईंनी सांगितले. पण त्याच्या घरात बायकोच्या बाळंतपणाची घाई सुरू होती. पिऱ्या बोथट कुऱ्हाडीने लाकडे फोडू लागला. पिऱ्याने घामेघूम होऊन लाकडे फोडली. त्याचा बिंडा बांधून कचेरीच्या दारात टाकला. ती बघून आचारी अंगावर खेकसला व म्हणाला, ''ल्येका !लाकडं जरा बारीक फोडली असतीस तर तुझ्या बाचं काही खरचलं असतं का ?''[४१] हे त्याला आचाऱ्याकडून ऐकून घ्यावे लागते. शिरस्तेदारही असे काहीसे बोलून त्याला वाटेला लावतात.

आता ऊन डोईवर आले होते. पिऱ्या घरी गेला. शिद्या व रक्मी गावात गेली होती. तानी

हेळावर सकाळीच पाणी भरायला गेली होती. भुईला अंग टेकताच पिऱ्याने हे ऐकले व तो पाणवठ्याकडे गेला. तानी पाण्याचा घडा पुढे ठेवून शेराच्या सावलीत बसली होती. पाणी भरणाऱ्या प्रत्येक माणसाला ती विचारी ''पानी वाढता का वं?'' थोड्या वेळाने महंमदभाईची बहिण आली. ती हेळात शिरली. तिने त्यात तोंड धुतले, दोन चुळा टाकल्या. तिने हंडा भरून पाणी तानीच्या घड्यात ओतले. तो घडा पिऱ्याने डोईवर घेतला व ती घरी परतली. रक्मी, शिद्या व तानी गावातून मागून आणलेले भाकरीचे तुकडे खात बसली होती. कारभारीण मोकाशाच्या घरी गेली होती. तिकडून आणलेल्या दोन शेर दाण्याच्या तिने चांगल्या पातळ कण्या केल्या. सर्वजण कण्या पिऊन झोपी गेले.

इकडे घोटाळा झाला होता. पिऱ्याचा निरोप येसकराने झोपेत ऐकला. त्याने पाटलाला या संबंधी कल्पना दिली नव्हती. साहेब त्या गावी गेले. गावात शुकशुकाट होता. चावडीवर कोल्हाटणीचा नाच सुरू होता. नाईक म्हणून महंमदभाईची लांब बदली होईल, पगार तोडतील अशी त्याची अवस्था झाली. बदली झाल्यावर नायकाची बहिण बेगम गावात जाणार याचे तानीला दु:ख होते.

गावात हरिबुवांचा उत्सव होता. संध्याकाळी किर्तन होते. मांडवाकडे लोक जमू लागले. मंडपासाठी व उत्सवासाठी पाटलाने मेढी दिल्या. भिकणभाईंनी पत्रे दिले. गावात आनंदी आनंद होता. साहेबाचे ऑफीस दुसऱ्या गावी गेले. पिऱ्याची बायको लुगडे नेसून तयार झाली. शिद्याने कपडे केले. मोडके कवाड पुढे करून पिऱ्याचे कुटुंब मंडपाजवळ पोहचले. दिव्यांचा झगमगाट झाला होता. मामलेदार, फौजदार गाद्यावर लोडाशी टेकून बसले. पिऱ्याचे कुटुंब दूर कोपऱ्यात उभे होते. आजूबाजूचे पिऱ्यावर खेकसत होते. त्याला बाजूला हो म्हणत होते. बुवांनी किर्तन सुरू केले. तुकारामाचा 'जे का रंजले गांजले' हा अभंग ते आळवीत होते. हरिबोवांचे वर्तन सर्वांशी समानतेचे होते. किर्तनात बुवांनी एकनाथाची गोष्ट सांगितली. माझा रामेश्वर गाढवाच्या अंतरात्म्यात आहे म्हणून एकनाथांनी गाढवाच्या तोंडात गंगेचे पाणी ओतले. गाढवाचा आत्मा तृप्त झाला. नाथांना आनंद झाला. सज्जन सर्व प्राणी मात्रांवर दया करतात. रानावनात देखील माणसांसाठी पाणपोई घातली पाहिजे. असे निरूपण बुवांनी केले. 'सीताराम दीनांचा कैवारी राम' असा जोराचा गजर चालला होता. मुले झोपेत होती. कारभारीण पेंगत होती. मुलांना खांद्यावर घेऊन पिऱ्या घरी परतला. तानी पिऱ्याला विचारीत होती. ''बाबा! त्या गाडवाच्या पोराला बामनानं कावडीचं पानी पाजलं, अन् आपल्याला गावाच्या हेळावर का वं भरू देत न्हाइती? पिऱ्याने सांगितले, ''तुला काय सांगू, आपला शिद्या झाला, म्हणजे गावकऱ्यांना विचारील याचा जाब.'' [३३] घरी जाऊन पिऱ्या झोपला.

## व्यक्तिचित्रे-

पिऱ्या- हे या कथेतले प्रमुख व्यक्तिचित्र आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील दलित वस्तीमधला हा पिऱ्या खूप दरिद्री व कमालीचा सहनशील आहे. त्याच्या संपूर्ण आयुष्याचे नाव आहे, कष्ट आणि हाल अपेष्टा ! उपाशीपोटी चावडीवरील कामे करत राहणे हाच त्याचा धर्म ! त्याच्या वाट्याला आली आहे अवमान व लाचारी ! निसर्गातल्या पाण्यालाही तो दुरावलेला आहे. इथल्या समाजव्यवस्थेने हे पशुचे जीवन त्याच्या वाट्याला आणले आहे. त्याला प्रतिकार करण्याची शक्ती त्याच्याकडे नाही. पण त्याच्या मुलाच्या काळात परिस्थितीत बदल होईल असे त्याला वाटते.

त्याची ही एक दिवसाची दैनंदिनी आहे. परिस्थितीने पिऱ्या मजबूर आहे, हरकाम्या आहे. तो कोठेही नकार दाखवित नाही. आपल्या रोजच्या गरजा म्हणजे प्रातर्विधी व खाणे. हे करण्यासाठी त्याला वेळ दिला जात नाही.

रात्रभर येसकराचे काम करून, थकून भागून पहाटे चार वाजता झोपलेल्या पिऱ्याला महंमदभाई 'रात्री झोपलास आता बाहेर चल !' असे म्हणतो व घेऊन जातो. त्याची बायको लाचारीने महंमदभाईला सांगत होती की आपला नवरा आताच झोपला आहे. पण त्या नाईकाला ते पटत नाही. खरे म्हणजे पुढच्या गावाला साहेब येणार असल्याची वर्दी नाईकाने दयायला पाहिजे. पण तो आपली गोणी पिऱ्याच्या डोक्यावर लादतो. पिऱ्याच्या शक्तीचे हे शोषण आहे.

उन्हाचे चटके सोसत, बोथट कुऱ्हाडीने तो कष्टाने लाकडे फोडतो. लाकडे लहान का फोडली नाहीत म्हणून आचारीही त्याच्यावर खेकसतो. त्याला मोबदला तर दिला जात नाहीच या उलट ''काय रे ! कोण तु? हं हं सरकारची कामं अशीच करता का? तुम्हाला फुकट खायला हवं !''[३४] या सारखे अपमानास्पद उद्‌गार ऐकून घ्यावे लागतात. हे त्याच्या श्रमाचे सहजतेने केलेले शोषण आहे.

त्याची कुठेच बंड करण्याची प्रवृत्ती नाही. निसर्गाने दिलेले हेळामधले पाणी त्याच्या तानीला भरता येत नाही. पाणी भरून नेणाऱ्या प्रत्येकाकडं ती विनवण्या करते. समाजातील उच्च समजले जाणारे कुणीही लोक तिला पाणी घालीत नाहीत. आपला मुलगा शिद्या याचा जाब विचारील असे उत्तर तो तानीला सांगतो. पुढच्या पिढीने याचा जाब विचारावा अशी त्याची भावना आहे. उलट पिऱ्याचे बोलणे आर्जवाचे, क्षमायाचना करणारे आहे. ही अस्पृष्यता इतक्या खोलवर पोहचली आहे की दलितांना माणूस म्हणून देखील मान्यता नसल्याचे हे द्योतक आहे.

हाल, विपत्ती, काळजी, अवमान सारे काही शांतपणाने सहन करणारे अस्पृश्य पिऱ्याचे व्यक्तिचित्र इथे माटे यांनी रेखाटले आहे.

चंद्रा- पिऱ्याची बायको हे या कथेतले दुसरे व्यक्तिचित्र. पिऱ्यापेक्षा ही थोडी कणखर आहे. आपला राग ती काही ठिकाणी व्यक्त करते. रात्रभर वर्दी देऊन आल्यावर पिऱ्याला पुन्हा पहाटे बोलवायला आलेल्या आपल्या महंमदभाईबरोबर तिचा बोलण्यातला सूर चढा आहे. काही ठिकाणी तर आपला राग ती शिव्या देऊन प्रकट करते. ''मडं गेलं त्या सरकारचं ! उत्पन्न असतं तर तुकड्यासाठी पोरं का धाडली असती गावभर?'' [३५] अशा तऱ्हेने संताप व्यक्त करणे म्हणजे राजद्रोह होय. अशी जाणिव महंमदभाई करून देतो.

महंमदभाई- हे प्रशासन करणाऱ्या वर्गाचे प्रतिनिधित्व करणारे पात्र आहे. पिऱ्याकडून तो वाटेल तशी कामे करून घेतो.

याखेरीज आचारी, शिद्या, रक्मी, तानी ही पात्रे अनुषंगाने येतात.

वातावरण-

दलित उपेक्षित पिऱ्याच्या निमित्ताने दलित व्यक्तीच्या जीवनातील कष्ट, दु:ख व दारिद्र्य यांचे दर्शन घडविणारे वातावरण या कथेत श्री.म.माटे यांनी चीत्रित केले आहे.

पाणवठ्यावरचा प्रसंग. तबाची मुलगी सकाळी लवकर पाण्याला गेली आहे. तानी शेराच्या सावलीत बसून काय ऐकत होती? ''दादा, पानी वाडता का वं?'' ''बया माजं मला काम हाय.'' ''बया, मला लई वकत झालाय.'' ''इश्श ! आम्ही का तुला पाणी वाढायचं?'' [३४] असे सारखे चालले आहे. बेगमने पाणी घेऊन तोंड धुतले, चुळा भरलेल्या. ते सारे चालते पण तानीचे घडा भरून वाहिलेले पाणी ब्राह्मण व कुणबी स्त्रियांना चालत नाही. हे विरोधाभासाचे वातावरण वाचकाला विचार करायला लावणारे आहे.

हरिबोवांच्या किर्तनाचा प्रसंग हा विराधाभास अधिक ठळक करतो. मामलेदार फडणीस बरोबर आलेला फौजदार मुसलमान आहे. पण त्याला मानाची खुर्ची आहे. मानमरातब पैशावर अवलंबून आहे. पिऱ्याला मात्र त्या परिट घडीच्या माणसात 'बाजूला हो त्यांना लागशील' असे माणूसकीला लाजवणारे उद्‌गार ऐकून घ्यावे लागतात. संत एकनाथांनी तहानलेल्या गाढवाला गंगाजल अर्पण केले. हा अख्यानाचा विषय आहे. पिऱ्याच्या कुटुंबियांना तासन् तास घडाभर पाण्यासाठी ताटकळत बसावे लागते. पिऱ्याची मुलगी लहान आहे. तिच्या हे लक्षात येते. ''बाबा ! त्या गाडवाच्या पोराला बामनानं कावडीचं पानी पाजलं, अन् आपल्याला गावच्या हेळावर का वं भरू देत न्हाइती?''[३३]

तबाला उपाशी पोटी् लाकडे धार नसलेल्या कुऱ्हाडीने फोडावी लागतात. वर पुन्हा बारीक नाही फोडली म्हणून शिव्या खाव्या लागतात. आत मात्र मामलेदार, फडणीस यांचा फराळ

चाललेला असतो. आतून ढेकरांचा आवाज ऐकू येत असतो. हा विरोधाभास आहे.

## संवाद व भाषाशैली-

गावच्या उत्सवासाठी कुणी काय दिले यासाठी माट्यांची लेखनशैली सूक्ष्म वर्णन करते. 'कोणी काही कोणी काही असे सामना पुरवून मोठा सुंदर थाट केला. पाटलाने मेढी दिल्या. भिकणभाईंनी पत्रे दिले. गणू हलवायाने बत्तासे दिले. फौजदारांनी परवानगी दिली. बापुशास्त्री पुराणिकाने अक्षता दिल्या. वरल्या घरच्या सावकाराने हुंड्या झुंबरे दिली. मी दवंडी दिली. कासमने बुक्का दिला. गेन्या मांगाने चराटे दिली. आज गावात जिकडे तिकडे आनंदी आनंद होता.' [३६]

खुळखुळा, राजद्रो, शेवटून, खोकाळा, वंगाळ, हातीपायी येणे, जाळ येणे यासारखे ग्राम बोलीतले शब्द जागोजागी वापरले आहेत.

कथेतले संवाद ग्रामीण बोलीतले आहेत. त्यामुळे त्यांचे विश्व ठळकपणे साकारण्यास मदत होते.

''पाया पडते महाराज, मालिक निजल्यात, जिवाला वाइच ग्वाड वाटत नाही.'' ''काय धाड बडवली आहे त्याला ! कापला तर दोन होतील !'' ''जरा वाईच जाळ आलाय !'' ''अरे सकाळी पाच मण लाकडं फोडलीन् भर उन्हात ! अन् ताप यायला काय झालं ?'' ''माझ्या गळ्याच्यान् त्यास्नी जाळ आलाया.'' ''बया ! तुझ्या नवऱ्याला सांगितलं की... पूरच्या पाटलाला साहेब येतोय म्हणून वर्दी दे. मला म्हणाला, वर्दी दिली, अन्'' ''भाईसाब, तुमच्या गळ्याची आन, त्ये ग्येलं व्हतं.'' [३७]

हा चंद्रा व महंमदभाईचा संवाद आहे. फक्त स्वत:चा विचार करण्याची मालक वर्गाची प्रवृत्ती व दुसऱ्याला माणूसकीहीन वागणूक देण्याची पध्दत या बोलीतून लक्षात येते.

अस्पश्यांच्या विदारक जीवनाचे चित्रण करणारी ही कथा आहे. त्या जीवनातील कष्ट, दारिद्रय, दु:ख, लाचारी, अवमान यांचे सुस्पष्ट दर्शन या कथेतून होते. दलित कथेचा प्रारंभ या कथेतून झाला आहे असे मानण्यास भरपूर वाव आहे. एक दिवसाचे केलेले वर्णन विचारप्रवर्तक आहे. एकंदरीत या कथेत अस्पृश्य येसकराला एक दिवसाच्या काळात लाचारीला, शोषणाला, दारिद्रयाला कसे तोंड द्यावे लागते, माणूस म्हणून त्याची अवहेलना कशी होते, जगत असताना त्याला किती अपमानीत होऊन जगावे लागते, त्याचेच चित्रण इथे केले आहे. हे चित्रण करताना माट्यांनी तत्कालिन अस्पृश्यांच्या स्थितीगतीचे चित्र यथातथ्य मांडले आहे. म्हणून या संग्रहातील ही एक महत्वाची कथा होय.

## ११.माझे मनोराज्य !

### कथानक-

राजे लोकांना त्यांची राज्ये असतात. पण परमेश्वर गरिबांना विसरलेला नाही. उंच उंच इमारती राजांसाठी तर त्याच्या सावल्या उन्हापासून रक्षण व्हावे म्हणून गरिबांच्यासाठी असतात. राजगृहातील स्वादीष्ट पदार्थांचा सुगंध गरिबांच्यासाठी राखून ठेवलेला असतो. दिसायला देखण्या असलेल्या स्त्रिया राजांसाठी तर त्या मोटारीतून जाताना टाळ्या वाजविण्याचा हक्क त्याने गरिबांच्यासाठी राखून ठेवलेला असतो. गरिबांसाठी राज्ये नसली तरी मनोराज्ये त्यांनी राखून ठेवलेली आहेतच. मनोराज्ये ही मनुष्याला व्यापून राहिलेली संस्था त्याने निर्मिली आहे.

राजे लोकांच्या मुकुटांना आतून काटे असतात. परंपरागत पध्दतीने बापाचे राज्य मुलाला मिळते. पुन्हा राज्य जिंकायला सुध्दा कष्ट पडतात. प्रजेच्या वाढत्या त्रासामुळे तो सांभाळणे कठीण होत चालले आहे. मनोराज्यात प्रजाच नाही त्यामुळे राज्य चालविण्याचे कष्ट नाहीतच. पण कोणते साहसही करावे लागत नाही.

राज्ये कमावताना जसे कष्ट तसे गमावताना देखील पडतात. मनोराज्यात हे नाही. मिळवायला प्रयत्न नाहीत. घालवायला कष्ट नाहीत. राजांनी देखील मनोराज्ये सोडून देऊन मनोराज्य करावयास शिकावे. असे माट्यांना वाटते.

लेखकाला मनोराज्य हवे तेव्हा उभे करता येते. डोक्याला जास्त बौध्दिक काम पडले, नको असलेल्या गोष्टीचा विसर पडायला हवा असला तर लेखक मनोराज्यात गर्क होतो. आजारी असताना मनोराज्ये फार उपयोगी पडतात. कारण रूग्णावस्थेचे क्लेश त्यामुळे कमी होतात.

मनोराज्ये अनेक प्रकारची असतात. पण लॉटरीत बक्षिस मिळण्याचे मनोराज्य लेखकाला फार आवडते. कारण त्याला फारसे श्रम करावे लागत नाहीत. निपुत्रिक संस्थानिकाने दत्तक घेणे, खणताना मोहरांचा हंडा लागेल, जलदेवता बाहेर येऊन हिरेजडित सोन्याची कुऱ्हाड देईल या सर्व मनोराज्यांपैकी एकही प्रयोजन वास्तव नाही व शक्य ही नाही. या उलट लॉटरीचे बक्षीस कदाचित शक्य आहे. त्यांसाठी फक्त दिड रूपया भांडवल लागते व निकाल लागेपर्यंत आपण मनोराज्ये करू शकतो. गरजू, उपेक्षित व कष्टी लोकांच्यासाठी खर्च करण्यास पुष्कळ पैसा असावा असे वाटते. लॉटरी लागल्याशिवाय हे शक्य नाही.

बक्षीस मिळाले तर काय करायचे याचे नियोजन आहे. पहिले दोन लाख रूपये अस्पृश्यांच्यासाठी. सरकार त्यांच्यासाठी काय करेल ते करो. पण दोन लाख तरी बोअरिंगच्या किंवा साध्या विहिरी काढण्यासाठी. 'गाव तेथे महारवाडा आहे.' एवढ्यांनी काय होणार पण यथाशक्ती आपण करावे असे त्यांना वाटते. उरलेले एक लाख डिप्रस्ड विद्यार्थ्यांच्या युनिव्हर्सिटी

परीक्षांच्या फीसाठी रक्कम व्याजी लावून ठेवण्याची व्यवस्था करण्याचा लेखकाचा मनोदय आहे.

तसेच बऱ्याच लोकांचे जीवन सार्वजनिक हितासाठी खर्च होते. काहीजण आयुष्यभर ज्ञानाच्या मागे असतात. त्यांच्या वृध्दापकाळासाठी त्या माणसापुरती का असेना पण व्यवस्था करावी असे लेखकाला वाटते. सरकार त्यांना मदत देईलच पण स्वदेश बांधवाने दिले तर त्यांना अवमानाचे वाटू नये. तसेच समाजातील ठराविक कामासाठी वाहून घेतलेली माणसे, उदा. संशोधक- मूर्तिविज्ञानकर्ते खरे, अण्णासाहेब शिंदे यांच्यासाठी काही मदत द्यावी. त्यांना योग्य वाटली तर घेतील नाहीतर नाही. हेही माट्यांचे एक मनोराज्य आहे.

बुधवारात श्रमिक मंदिराची योजना आहे. जवळच एका शेडमध्ये रोज पन्नास लोकांची जेवणाची व्यवस्था करायची व त्यात मधून मधून आपणही जेवायला जायचे असाही एक मनोदय आहे. मंदिर व या योजनेसाठी दिड लाख रूपयांची तरतूद लेखक करतो.

शिक्षणाचा प्रसार तळागाळात व्हावा म्हणून भिल्ल, रामोशी, बंजारी, कातकरी यांच्या जेवणाची व्यवस्था करायची व शिक्षणाचे सर्व संस्कार त्यांच्यावर करायचे. भारतीय इतिहास संशोधन मंडळाची इमारत व सर परशुराम भाऊ कॉलेजमध्ये मराठीसाठी एक सुंदर हॉल, साताऱ्याच्या न्यू इंग्लिश स्कूलच्या हवाली पंचवीस हजार रूपये, विष्णूबुवा ब्रह्मचारी व लोकहितवादी यांच्या नावाने दोन शिष्यवृत्या, शिवाजीराव दामले मैदानाचे डांबरीकरण करून त्यासाठी पायऱ्या, नव्या मैदानावर दहा हजार रूपये खर्चून नवी इमारत बांधणे हेही एक मनोराज्य आहे.

याखेरीज मनासारखे एक साप्ताहिक काढायचे, लोकशिक्षणाचे काम करायचे, शब्दकोश मंडळाच्या कामासाठी घसघशीत मदत करायची ही लेखकाची वैयक्तिक मनोराज्ये आहेत.

तसेच आपल्या माणसांच्या सोबत चार बोगी राखून ठेवून उत्तर व दक्षिण अशी यात्रा करायची, पंगतीला दोन विद्वान लोक बोलावून चर्चा करायची, पाच तरी गरीब लोक घरी जेवायला घालायचे. अशा बारीक सारीक गोष्टी करायच्या आहेत. पण लॉटरीच्या पैशांना मर्यादा आहे.

शेवटी विचार करता या मनोराज्याचा पोकळपणा लक्षात येतो. परमेश्वराची कृपाच होणार असेल तर आपण निमित्त का व्हावे? परस्पर त्यानाच ते मिळावे. मनोराज्यांची त्यांची नशा नाहीशी होते व सर्वसामान्य माणसाच्याच वाटेने जाण्याचा मनोदय माटे व्यक्त करतात.

माटे मनोराज्ये करतात ती देखील उपेक्षितांचे भले करण्याची !

## भाषाशैली-

सर्वसामान्यपणे कथा लिहिताना जी भाषा माटे वापरतात त्यापेक्षा ललित लेख लिहिताना

येणारी भाषा श्रीमंती थाटाची व आशयसंपन्न असते. भाषेवरून त्यांची वैचारिक झेप किती मोठी होती याची कल्पना येते. करूणाघन परमेश्वर,तिलोत्तमेसारख्या सुंदर स्त्रिया, मनोराज्यांचे आस्वाद्य सुख, सर्वज्ञ आदितत्वाच्या कृपेचा पाऊस यासारखे माट्यांनी वापरलेले शब्दप्रयोग उदाहरणादाखल देता येतील.

हा एक ललित लेख आहे. आपल्याला लॉटरी लागली तर त्या पैशातून आपण काय करणार आहोत त्याचा हा आलेख आहे. मजुरांसाठी अन्न छत्र उघडणे, भटक्या जमातीतील मुलांना शिक्षण देणे, शिक्षण संस्थांमध्ये शिष्यवृत्ती सुरू करणे, शब्दकोश तयार मंडळास मदत करणे, दलित वस्त्यांना पाणी पुरवठा करणे, समाजातील तळागाळातल्या मुलांच्या शिक्षणासाठी विद्यापीठ परिक्षांची फी भरणे अशी सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक कामे करण्याचे नियोजन माट्यांनी इथे केले आहे. माटे हे लोकशिक्षक आहेत हे येथे पूर्णत: जाणवून जाते. वरील गोष्टी झाल्या पाहिजेत हे त्यांचे स्वप्न आहे. त्यासाठी त्यांचे मन तिळतिळ तुटते. माट्यांच्या मनातील ही सामाजिकता अस्सल आणि प्रामाणिक आहे. माट्यांच्या समाजमनस्क व्यक्तिमत्वाचे दर्शन या ललित लेखातून सहृदय वाचकास निश्चित जाणवते.

## १२.नाथनाक व देवकाई यांची काळझोप

श्री.म.माटे यांनी लिहिलेली ही एक हृदयद्रावक कथा आहे.

### कथानक-

पुरंदर किल्ला बिदरच्या बादशहाच्या काळात मजबूतपणे बांधला गेला. त्या किल्ल्याला मोठा बुरूज बांधणे संरक्षणाच्या दृष्टीने आवश्यक होते. बादशहाने बुरूजाच्या बांधकामाचा हुकुम दिला व किल्लेदाराने बांधकामाला सुरवात केली. कधी कधी त्या काळात बांधकाम पुन्हा पुन्हा ढासळे व भूमीदेवतेला संतुष्ट करण्यासाठी जिवंत माणसांचे बळी दिले जात असत. तो बळी दाखविण्यासाठी इमारतीत एखादी झरोक्याची खूण ठेवत. या खुणेला 'यशवंतराव' म्हणत. पुरंदर कि ल्ल्यावरील शेंदऱ्या बुरजाचा 'यशवंतराव' त्याच्या पायात आहे. त्याचीच ही कथा आहे.

किल्लेदाराने गवंड्यांना लावून दिड महिना बांधकाम केले. पण एक दिवस पाहतात तो बांधकाम जमिनीत गडप झालेले. पुन्हा काम सुरु केले, पाया रचला कमान बांधली. थोड्या दिवसात कमान खचली व बांधलेल्या पायाला भेगा गेल्या. गवंड्यांची अक्कल गुंग झाली. किल्लेदाराने दोन बकरी चार कोंबडी आणून पायात कापली. पुन्हा काम सुरू झाले. दोन महिने काम झाले पण आता सुध्दा कमान खचून गेली. तीन वेळा असे झाले. कोंबडी बकरी मारली पण काम वर आले नाही. किल्लेदाराने बिदरच्या बादशहाला तसे कळविले. महिन्याभराने बिदरहून

लखोटा आला. त्यात लिहिले होते, ''माणूस बळी दिला तर बांधकाम टिकेल असा दृष्टांत झाला.'' किल्लेदार दादा कलमे चिंतातूर झाला. हळूहळू त्याने माणसाच्या शोधाला सुरूवात केली. किल्ल्याच्या प्रचंड डोंगरावर पहाऱ्यासाठी अनेक मेटी होती. ते काम कोळी व महार करीत असत. दोन अडीचशे कोळी व महार या मेट्यावरून पहारा करीत. ही कोळी व महारांची कुटुंबे काय असेल नसेल ते खावून रूटूखूटू जीवन जगत असत. यातूनच एखादा माणूस शोधण्याचा दादा कलमचा प्रयत्न होता. ही कुटुंबे दरिद्री होती. कोळ्यांचा नायक येसाजी चिबे होता. सर्व किल्ल्याची राखणदारी आपल्याला मिळावी ही त्याची इच्छा होती. मलिक हवालदाराला हे माहित होते. त्याने कोठीवर बोलावून चिब्याला बादशहाचा निरोप सांगितला. चिब्या मलिकला म्हणाला, ''माझा मोठा मुलगा व सून मी बादशहा साठी पायात घालतो. पण तुम्ही इतक्यात हे कुणाला बोलू नका.'' बहिरनाक हा महारांचा म्होरक्या. त्याची व येसाजी चिब्याची स्पर्धा होती. मलिकने बहिरनाकला बादशहाची इच्छा सांगितली. त्याच वेळी चिब्याची झालेली तयारी सांगितली. ते ऐकून बहिरनाक उसळला म्हणाला, ''साहेब मी माझा मुलगा व सुन देतो.'' चिब्याने बहिरनकाला हुलीवर घालण्यासाठीच तसे म्हटले होते. कुलदेवतेची शपथ घेऊन आपण मुले देण्यास तयार आहोत असे घोषित केले.

बहिरनाकची बायको जानकाई. आपली पोरे देऊन आपण समद्या किल्ल्याची राखणदारी कमवूया ही कल्पना त्या नाखूष जानकीच्या मनात त्याने घुसवली. मलिक हवालदार बहिरनाकाच्या मेट्यावर आला. बळी देईल त्याला किल्ल्याची राखणदारी, न्हावी मोंगली गाव, सातशे पाच होनांचा गाव बक्षीस मिळेल असे बादशहाने सांगितले होते. आता किल्ल्याचे काम सुरू झाले. शेंदऱ्या बुरूजाचे काम वेगाने सुरू झाले. हळुहळु लोकांच्या कानावर बहिरनाकचे हे म्हणणे जात राहिले. दारिद्रयात मरणाऱ्या बहिरनाकला हजार होन मिळणार होते. माझा मुलगा व सून देतो असे बहिरनाकने सांगितले ते मोठ्या धीराने.

बहिरनाकचा मुलगा नाथनाक व त्याची बायको देवकाई यांना तो बळी देणार होता. देवकाईचे आईबाप पलिकडेच मेटेकरी होते. देवकाईचा वडील इटनाक हा होता. इटनाकची बायको इटनाकला बहिरनाककडे शंभर होन मागण्यास सांगत होती. आपली मुलगी मरते आहे हे ऐकून ती घरी आरडा ओरडा करू लागली. पाणी आणायला आल्यावर ती जानकाईला वाटेल ते बोले. शिव्याशाप देई. इटनाकची बायको गजाबाई हिला जानकाईने खूप समजून सांगितले. आपलीही इच्छा नाही असे तिने सांगितले.

अश्विन वद्य अष्टमीचा दिवस जवळ येऊ लागला. तो प्रसंग पाहण्यास भोवतालच्या टापूतून हजारो माणसे गोळा होत होती. हळूहळू माणसे जमू लागली. बलीदानाचे काम शेवटास नेले पाहिजे असे बहिरनाकला वाटू लागले. बहिरनाकची बायको सारखी रडत होती. शेंदऱ्या बुरजाचा भोवतीचा सगळा टापू माणसांनी भरून गेला होता. बिदरचे अधिकारी आले होते. प्रसंगाचे

दु:खाचे रूप जाऊन उत्सवाचे रूप आले होते. जानकाई बावरून गेली होती. ढोल व झांजा वाजू लागल्या. कजाग गजाबाई देखील गांगरली होती.

नाथनाक तेरा चौदा वर्षांचा व देवकाई दहा वर्षांची असेल. आपले काय होणार हेच त्यांना माहित नव्हते. त्या दोघांना आता अलीकडे दहापाच दिवस गोडधोड घालणे चालू होते. त्यांना चांगले कपडे घातले होते. आजूबाजूचे लोक नाथनाक व देवकाईला नमस्कार करीत होते. पोरांना तर यातले काहीच कळत नव्हते. अष्टमीचा दिवस उजाडला. प्रहर दिवसाला नाथनाक व देवकाई यांना बांधकामाच्या पायात घालायचे होते. पायात त्यांना बसविण्यासाठी जागा तयार केली होती. भोवतीच्या भिंती भक्कम केल्या होत्या. बहिरनाकचा एक नातेवाईक होता. त्याचे नाव गणनाक. किल्ल्याचा हवालदार दादा मलिकने गणनाकला विश्वासात घेतले. त्याला काही सोन्याच्या मोहरा दिल्या. मलिक व गणनाक हे दोघे बुरूज बांधण्याच्या जागेकडे गेले. पाचसात हजार माणसे जमली होती. ढोल मृदंग यांचा आवाज वाढला होता. आज बहिरनाकची लेक व सून यांचा बळी द्यायचे होते. गडावर तासकरांनी आठचा घंटा वाजवला. नवाच्या घंट्याला बळीचा बेत ठरला होता. दोन्ही मुलांना नाथनाक व देवकाईंना नवे कपडे घातले गेले. नाथनाकच्या कपाळाला शेंदूर लावला. देवकाईला कुंकवाचा मळवट भरला. दोघांच्या गळ्यात फुलांच्या माळा घातल्या. लोभी व धीट बहिरनाक मुलांचे मरण जवळ आलेले पाहून थरथरू लागला. त्याच्या छातीत धडधडू लागले. जानकाई तर हैराण झाली. आयत्या वेळी आपण पोरांना वाचवू असे बहिरनाकला वाटू लागले. गणनाक त्या उत्सवाचा कारभारी होता. तो म्हणाला, ''अजून एक घंटा हाय, तू अन् जानकाई डोंगराखालनं देवदर्शन करूनशीन या. अजून लई वकुत हाय, दर्शनाला निघा बेगी बेगी.'' [३८]

बहिरनाक व जानकाई खाली निघाले. त्याच्याबरोबर पाच पन्नास माणूस गणनाकने धाडले. ते खाली जाताच गणनाकने नाथनाक व देवकाईला त्या जागेवर उतरवले. बाहेर मोठ्या गर्जना चालू होत्या. गणनाकने हवालदाराला खुणावले. त्याने तास वाजविण्याचा निरोप दिला. तासकराने साडेआठलाच नवाचा घंटा वाजवला. वाद्यांचा प्रचंड गजर झाला. गणनाकने घाई करून त्या नाथनाक व देवकाईच्या डोक्यावर चिरा ठेवला. पुढे चुना व दगड यांनी ते बांधकाम भरून काढले. डोंगरावर आरडाओरड झाली. बहिरनाकची लेकसून गेली. बहिरनाक व जानकाई डोंगराखाली दर्शन करीत होते. नवाच्या ठोक्याचा आवाज त्यांच्या कानी पडला व ते दोघेही दचकले. कोलाहलाने त्यांच्या अंत:करणाचे पाणी पाणी झाले. जानकाई किंचाळली, ''पोरे गेली.'' असे म्हणून हंबरडा फोडला. भांबावलेला बहिरनाक वर जायला निघाला. पण त्याला घेरी आली. त्याच्या पायातली शक्ती गेली. ती दोघेही जमिनीवर कोसळली. अपत्य प्रेमाने त्यांची काळजे फुटून गेली होती. दूर बादशहाचा बुरूज उभा राहिला. त्याची काळजी दूर झाली. बुरूजाच्या पायात नाथनाक व देवकाई काळझोपेत वर्षानुवर्षे पडून राहिली आहेत.

## व्यक्तिचित्रे-

**बहिरनाक-** हे या कथेतील प्रमुख व्यक्तिचित्र आहे. तो महारांचा म्होरक्या आहे. एवढ्या प्रचंड व मजबुत किल्ल्यावर राहणारी ही जमात मात्र दरिद्री आहे. कुग्राम राहणी व कदान्न भक्षण हे त्यांच्या पाचवीला पूजलेले आहे.

दादा कलम किल्ल्याच्या बांधकामात मुले बळी देण्याच्या प्रस्ताव जेव्हा बहिरनाक समोर ठेवतो, तेव्हा बहिरनाक या गोष्टीला चटकन तयार होतो. कमालीच्या दारिद्र्यापोटी तो हे करण्यास तयार होतो.बहिरनाक स्वभावाने भाबडा आहे. दादा कलम व येसाजी चिबे त्याला हुलीवर घालताहेत हे त्याच्या लक्षात येत नाही. ''त्यो पाच्छाव, देवमाणूस, त्येला दिरिष्टांत झाला. कुनी ना कुनी मानसं दिली पायज्येत की!'' [३१] ही त्याची बादशहावरील जी श्रध्दा आहे ती त्याच्या भोळ्या भाबड्या स्वभावाची निदर्शक आहे. शिक्षणाचा संस्कार नाही, कमालीचे दारिद्रय या कारणानेच तो मुले द्यायला तयार होतो व त्यासाठी ढेगू मेगूची शपथ देखील वाहतो.

मनाने तो कणखर आहे. नाथनाक गेला तरी आपला शिदनाक आहे अशी तो मनाची समजूत करून घेतो व आपल्या पत्नीचीही तो समजूत काढतो. पण नेमक्या प्रसंगाला आपण काहीतरी करू शकू असे त्याला वाटत असते. पण तो काहीही करू शकत नाही. जेव्हा नवाचा घंटा साडेआठलाच वाजतो, तेव्हा पोरं गेली या भावनेने त्याचे बापाचे काळीज हेलावते. त्याच्या पायात पेटके येतात व तो तेथेच कोसळतो.

कमालीच्या दारिद्र्यापोटी न्हावी मोंगली गाव, सातशेपाच होनांचा गाव बक्षीस या आमिषाला तो बळी पडतो. पण पित्याचे काळीज त्याचा प्राण घेते.

**येसाजी चिबे-** गडावर राहणाऱ्या दोन अडीचशे कोळी लोकांचा हा म्होरक्या आहे. ही कोळी जमातही अतिशय गरीब आहे. गडावर राहणारे कोळी व महार एकमेकांचा मत्सर करीत. याचा फायदा दादा कलम उठवितो.

बादशहासाठी कोण मुले देईल त्याला किल्ल्याची राखणदारी मिळेल ही बातमी प्रथम त्याला दादा कलमकडून कळते. पहिल्यांदा तो आपली मुले द्यायला तयार होतो. पण हे सर्व वरवरचे असते. येसाजी चिबे हा कमालीचा धूर्त मनुष्य आहे. दादा कलम व तो दोघे मिळून बहिरनाकला हुलीवर घालतात. बहिरनाकला हुलीवर घालण्याचे बक्षीस म्हणून किल्ल्याची राखणदारी तो दादा कलमकडून मिळवतो. बहिरनाकला त्याबद्दल जास्त मोलाचे बक्षिस मिळते.

येसाजी चिबे हा कोळ्यांचा म्होरक्या अतिशय धूर्त आहे.

**दादा कलम-** हे या कथेतील अधिकारी वर्गाचे प्रतिनिधीत्व करणारे पात्र आहे.

तो बादशहाचा नोकर आहे. किल्ल्याचे काम पूर्णत्वास जावे म्हणून तो कोंबडी बकरी मारून पाहतो पण बुरूजाचे काम पूर्ण होत नाही.यासाठी त्याची नेमणूक आहे की बुरूजाचे काम पूर्ण करून घेणे. यासाठी बादशहा आपली गर्दन मारील याची त्याला भिती आहे.

एकमेकांचा मत्सर करणाऱ्या कोळी व महार जमातीतील कोणीतरी माणूस शोधायचा हे मनाशी ठरवून हा हवालदार स्वत: मेट्यावर जाऊन बहिरनाकला ढेगू मेगूची शपथ वहायला लावतो व वचनबध्द करतो. आपला बेत यशस्वी करतो.

**जानकाई-** ही बहिरनाकची बायको. तिची प्रवृत्ती कशी होती हे माट्यांच्याच शब्दात, ''बरिनाकची बायको जानकाई दुबळी आणि थापडवाईक असली तरी तिचे मन तयार करायला बहिरनाकला बरेच प्रयत्न करावे लागतात. पण तिचे मन त्याला तयार होत नाहीच. पण बहिरनाकच्या इच्छेपुढे तिचे काहीच चालत नाही. तिची कातर मनोवस्था तिच्या पुढील उद्‌गारावरून सिध्द होते, ''न्हाई वं बाई, तुम्ही असं कशापाई गागतासा? म्या तेस्नी धादा म्हटलं, आपलं प्वार अन् लोकाचं प्वार, आपलं तुमी मातीत का मिसळता !पन त्येनी आपलं याकुच धरलंया, त्ये म्हनत्यात पाच्छावाला दिरिष्टांत झालाया ! पाच्छावाला दिरिष्टांत झालाया ! अवं, त्येला दिरिष्टांत झाला बी असंल, पन आपली प्वारं आपुन का मारावी? पन् त्ये काई ऐकत न्हाइती.... अन् आता अष्टमी तर जवळ आली, बया माजा जीव जाया करतुया.''[४०]

नवाचा ठोका जेव्हा साडेआठलाच दिला जातो तेव्हा डोंगराखाली दर्शनाला गेलेल्या जानकाईचे मातृहृदय हेलावून जाते. 'पोरं ग्येली वं ग्येली !' म्हणून ती किंचाळी फोडते. कोणत्याही आमिषाला बळी न पडणारी ही जानकाई मुले बळी देण्यास मनापासून कधीच तयार होत नाही. ढेगू मेगूची शपथ वाहन्यापासून ती त्याला परावृत्त करण्याचा प्रयत्न करते.

## वातावरण-

बाराव्या तेराव्या शतकातील मोघल कालखंडाच्या पार्श्वभूमीवर प्रथमत: ही कथा सुरू होते. महाराष्ट्राच्या राखणदारीची जिम्मा जवू या गडाने घेतली आहे असा गड मजबूत करण्याचे बादशहाचे धोरण, पुरंदर किल्ल्याचे केलेले वर्णन अगदी मोजक्या शब्दात माट्यांनी केले आहे. त्यामुळे ऐतिहासिक कालखंडाबरोबरच मोघलांचे राजकीय धोरण चटकन लक्षात येते.

माट्यांना या वातावरणापेक्षाही एका वेगळ्या घटनेचे चित्र इथे रेखाटायचे आहे. या अभेद्य गडावर रखवालीला असलेल्या कोळी व महार जातीचे कमालीची दारिद्रय माट्यांना अस्वस्थ करते. दारिद्र्यापोटीच बहिरनाक आपली मुले पायात घालायला तयार होतो.

अश्विन वद्य अष्टमीचा दिवस जसा जवळ येतो तसे लोक जमू लागतात. बहिरनाकच्या मुले बळी देण्याच्या घटनेवरील लोकांच्या प्रतिक्रियेवरून आपल्याला तत्कालिन लोकमानसाचे दर्शन

घडते,'कोणी म्हणाले,''पाच्छाव थोर. त्यांना दृष्टांत झाला, मग काय हरकत आहे?''कोणी विचारले पाच्छावाला वडील मुलगा अन् सून असेलच की नाही? त्यांनाच का नाही गाडीत?'' मनातल्या मनात थरथरून कोणी राजनिष्ठ उद्गारले,''असलं बोलणं बरं नाही, हे अंगारवर उतरल्याशिवाय राहायचं नाही.''कोणी समाधान मानले,''आपल्याला काय करायचं आहे ? ज्याचा मुलगा तो देणार !''[४१]

ही माणसे कमालीची दरिद्री असल्याने याचा फायदा घेऊन येसाजी चिबे, गणनाक-महारांचा म्होरक्या अशी काही माणसे मुले बळी देण्याच्या गंभीर व दु:खदायक घटनेला उत्सवी स्वरूप देतात.

ढेगू मेगू ही खास महारांचीच देवता आहे. तिची शपथ घालून बहिरनाकला वचनबध्द केले जाते.

## संवाद व भाषाशैली-

या कथेतील सर्व संवाद ग्रामीण बोलीतले आहेत. त्यामुळे या कथेला जिवंतपणा येतो. ''जा, तू दे जा, तूच आपली पोरं दे, तूच किल्ल्याचा राखणदार हो, मी भीक मागंन. तू शिरिमंत हो.'' जिंकलीसे पाहून महार म्हणाला,''हो हो देनारच, मीच शिरिमंत होनार. नाईक माजीच पोरं मी देणार.'' तवा तापला आहे हे पाहून मलिक म्हणाला,'' वहा पाच्छाची शपथ, वहा ढेगू मेगूची शपथ.'' [३९]

या लोकांची मनोवस्था देखील या संवादातून कळते. आत्यंतिक दारिद्र्यापोटी तयार होणारा बहिरनाक व त्याच्या या मनस्थितीचा फायदा दादा कलम घेतो.

मुले बळी दिली जातात व बहिरनाक व जानकाईच्या मनाची उलघाल माट्यांच्याच भाषाशैलीत,'पण बहिरनाक आणि जानकाई अजून डोंगराखाली 'दर्शन'च करीत होती. कारण अजून नऊ वाजायला 'लई वकुत' होता. पण नवाच्या ठोक्याचा आवाज कानी पडताच ती खाली दचकली. ठोक्या मागोमाग झालेल्या भयानक गजराने तर त्यांच्या अंत:करणाचे पाणी होऊन गेले. 'पोरं ग्येली वं ग्येली.'! म्हणून जानकाईने किंचाळी फोडली. 'चल बेगी बेगी वर' म्हणून भांबावलेला बहिरनाक डोंगरावर जायला परत निघाला, पण आता त्यांच्या पायात पेटके येऊ लागले. त्याला घेरी येऊ लागली, त्यांनी एकमेकांकडे भरल्या डोळ्यांनी पाहिले आणि ती दोघेही भुईवर कोसळली. त्यांना तेथून कोणी उचलले की, ती तेथेच मरण पावली याची आठवण इतिहासाला नाही.''[४२]

## रसग्रहण-

माट्यांनी लिहिलेली ही सरळ सरळ काल्पनिक कथा आहे. उत्पन्नाच्या आशेने बहिरनाक महार पोटच्या पोरांना बळी देण्याची तयारी करतो पण तो प्रसंग आल्यावर मात्र वितळून जातो. मानवी स्वभावातील हा विरोधाभास दाखविणे व बहिरनाकच्या मानसिक स्थितीवर प्रकाश टाकणे हा या कथेचा उद्देश आहे.

किल्ल्याच्या पायात बालकांना बळी देण्याची कथा ही अंधश्रध्दा वाढविणारी कथा आहे असे काही जण म्हणतात, पण समाजसेवक माटे मास्तर असे करतील काय? दारिद्र्याचे चटके भोगणारी असहाय दलित माणसे बक्षिसाच्या आशेने लेकरांना बळी देण्याचे धाडस करतात पण ती वेळ येताच मनाने थरथरून जातात हे मानवी स्वभावातील एक मार्मिक व हृदय दालन येथे माटे यांनी उघडले आहे. कथेतील वातावरण ऐतिहासिक ठेवून बुरूजाच्या बांधकामाचे वर्णन करीत संबंधित माणसांच्या मनाच्या स्थितीगतीचे आलेख मांडीत माट्यांनी ही कथा जिवंत केली आहे. इतिहास काळातील वातावरण लेखकाने यथातथ्य जपले आहे. त्याला कोठेही तडा जाऊ दिलेला नाही. कथेचा शेवट खूपच भावनाशील झालेला आहे. बहिरनाक व जानकाई यांची झालेली स्थिती लेखकाने हुबेहुब मांडली आहे. ते वाचून सहृदयी वाचकाच्या मनाला पाझरच फुटतो. व्यक्तिंची, पात्रांची नावे देखिल ऐतिहासिक आहेत. येसाजी चिबे याने आपली मुले देण्याचे ठरविल्यावर बहिरनाक आपली मुले इर्षेने द्यायला तयार होतो. येसाजीची ही घोषणा बहिरनाकला हुलीवर घालण्यासाठी होती पण ते त्याला कळले नाही म्हणून तो त्यात फसला. येसाजी चिबे याच्या मतलबी व्यक्तिमत्वावर माटे यांनी भेदकपणे प्रकाश टाकला आहे. हवालदार मलिकने आयत्यावेळी गणनाकला कारभारी केले व त्याच्याकडून हवी ती गोष्ट साध्य करून घेतली. मानवी स्वभावाचे कथेतील हे विविध नमुने माट्यांनी कौशल्याने मांडले आहेत. त्यातून आकार घेणारी ही कथा मानवी स्वभावावर प्रकाश टाकते. इतिहास काळातील ही कथा माट्यांनी आपल्या खास शैलीने जिवंत केली आहे. गजाबाई, जानकाई यांची ही व्यक्तिचित्रे तेवढ्यापुरती आकर्षकपणे रंगवून कथेचा बांध बांधेसूद केला आहे.

## १३.इंद्रायणीच्या वाळवंटात

हा माट्यांचा चिंतनशील निबंध आहे.

बरोबर विद्यार्थी वर्ग घेऊन सहलीला जाण्याच्या आनंदाने सुरवात करून माटे या कथेत वाङ्मय परंपरेत सच्चा असणाऱ्या तुकारामाच्या सर्व साधक अवस्थेपासून सिध्द अवस्थेपर्यंतचे वर्णन करतात.

सहल विशेषत: विद्यार्थी वर्गासोबत केल्याने वृत्ती उल्हसीत होतात. करमणुकीचे अनेक

प्रकार, फराळाचे अनेक जिन्नस त्यामुळे सबंध दिवस मोठ्या गमतीने जातो. वर्षभर एकत्र बसून जो परिचय होत नाही तो दहाबारा तास एकत्र घालविल्याने होतो. पण सहली एक तर सृष्टी सौंदर्याच्या ठिकाणी किंवा ऐतिहासिक स्मृती उचंबळून येतील अशा ठिकाणी सर्वसाधारणपणे जातात.

माटे विद्यार्थ्यांच्यात मिसळणारे शिक्षक असले तरी चालू असलेल्या करमणुकीच्या साधनांपेक्षा वेगळा विचार करून त्यांनी विद्यार्थ्यांची सहल देहूला नेण्याचे ठरविले. विद्यार्थ्यांच्या दृष्टीने तेथे काहीच प्रेक्षणीय नाही. विठ्ठलाचे मंदिर, नदीचा काठ, तुकाराम बुवांच्या अभंगाच्या वह्या ज्यात टाकला तो डोह. एवढीच पाहण्यासारखी ठिकाणे. विद्यार्थ्यांना सोडून माटे एकटेच डोहाच्या काठी फिरावयास गेले असता त्यांच्या मनात जे विविध विचार आले ते त्यांनी या मुक्त चिंतनात मांडले आहेत.

तुकारामाने परमार्थाची आवड उत्पन्न झाल्यावर माघार घेतली नाही. आपली जिज्ञासापूर्ती व्हावी यासाठी त्याने सर्व प्रश्न दैवताला विचारले. वरवर पाहता तुकारामाचे चरित्र साध्या माणसाचे चरित्र वाटते. कोणतीही भिड न ठेवता तो सर्व प्रश्न परमेश्वराला विचारतो. पण तुकारामाचे आपल्यासारखे अल्पज्ञानावर समाधान झाले नाही. आपण कुठून आलो? कुठे जाणार? या संबंधीचे दु:ख त्यांना सतत जाणवू लागले. इथेच सामान्य माणसात व तुकारामात फरक पडतो. 'येणे दु:खे माझा फुटो पाहे प्राण!' अशी तुकारामाच्या मनाची अवस्था होते.

आपल्या मनात प्रश्न असतातच पण जिज्ञासा, कौतुक अशा स्वरूपाचे असतात. पण तुकारामांच्या बाबतीत तो हृदयीचा रोग बनला. आपल्या संगतीतल्या तुकारामाने परमार्थभूमीतील भगिरथ बनण्याचा निश्चय केला. 'देह जावे अथवा राहो' हीच त्याची प्रतिज्ञा होती. त्याने तर्काला स्थान न देता भावच प्रमाण मानला.

सुंदर रूपडे डोळ्यापुढे होते पण प्राप्तीचा रस्ता दूर होता. ध्यान हेच पूजन झाले. पाणी, फुले ही देवाच्या पूजेसाठी वापरावीत तर ती देवाच्या घरची होती. गायन करावे तर नाद, टाळी वाजवून ! नाचावे तरी सर्व देवाचाच अंश अशी अवस्था होती. 'तुजलागी माझा जीव झाला पिसा ' अशी तुकाराम परमेश्वर प्राप्तीसाठी आरोळी ठोकत आहेत. परमार्थाची भूक लागलेल्या कार्लाइलपेक्षा तुकाराम श्रेष्ठ आहे. परमेश्वर प्राप्तीसाठी भुतकाळाच्या गुहेकडे 'कोहं' असा ध्वनी करून कार्लाइल निराश होऊन थांबला नाही. त्याने सगळे पाश तोडून टाकले. करमणूकीसाठी किंवा इतरांपेक्षा थोडासा वेगळेपणा दाखविण्यासाठी केवळ प्रश्न विचारण्यात काहींना मोठेपण वाटतो. पण तुकारामासाठी ही करमणूक नव्हती.

एकदा शास्त्रसिध्दांत समजून घ्यायचा तर शास्त्रज्ञ लोक प्रयोग शाळेची दारे लावून वीस वीस वर्षे आत बसतात. हे तर विश्वरूप समजून घ्यायचे होते. तुकाराम बायका मुलातून उठला.

म्हणजे त्यांनी आसक्ती सोडली.

''बाईल मेली, मुक्त झाली। देवे माया सोडविली।।''

''पोर मेले बरे झाले। देवे मायाविरहित केले।।'' हे तुकारामाचे उद्‌गार आहेत. 'विठो तुझे माझे राज्य। नाही आणिकाचे काज।' या वृत्तीशी तुकाराम तन्मय झाले.

ज्ञानी, वेदपयायण, पंडित, महंत यापैकी कोणाकडे जावे अशी संभ्रमावस्था तुकारामाच्या मनात निर्माण झाली. पण तुकारामाने परमेश्वराचेच पाय धरले. ते म्हणतात, ''मला गती म्हणजे काय हे काही कळत नाही; अधोगती म्हणजे काय, हेही कळत नाही; कर्म म्हणजे काय हेही कळत नाही; आणि धर्म म्हणजे काय याचीही कल्पना नाही; पुण्य कशाला म्हणावे आणि पाप निरसावयाचे म्हणजे काय करायचे याची कल्पना मला नाही, म्हणून मी केवळ तुझ्या पायीच भाव ठेवला आहे.''[५४] ही त्याची निष्ठा आहे.

ज्ञानी, वेदपरायण, पंडित यांची जरी तुकारामाने उपेक्षा केली तरी बाबाजी चैतन्यांच्या रूपात गुरू त्यांना करावा लागला. तोही त्यांना गुरूपदेश स्वप्नात येऊन केला असे तुकाराम महाराज स्वच्छ सांगतात. परमार्थ मार्गात तुकारामाला वेगवेगळे अनुभव येत होते. घरी परिवार नाही व देवप्राप्तीही नाही अशी अवस्था झाली होती. ''ओस झाल्या दिशा। मज भिंगुळवाणे। जिवलग नेणे। मज कोणी।।......एकला, निसंग, काकती मारण। भितो, नव्हे लाग चालावया।। तुका म्हणे वाट। दावूनी सद्‌गुरू। राहिला हा गुरू। पांडुरंग।।'' अशी त्याची स्थिती झाली होती. [४३] तथापी तुकारामाची गुरूवर अढळ श्रध्दा होती. परमेश्वर चराचराला व्यापून उरला आहे. तो असामी आहे. शब्दातीत आहे. पण तुकाराम परमेश्वरापुढे टाळमृदुंग वाजवून नृत्य करतो. त्याला फुलांच्या माळा घालतो. आपल्यासाठी निर्गुण निराकाराला तो सगुण करतो. तुकारामाचे सर्व देहावयव परमेश्वर प्राप्तीचा आनंद अनुभवू लागले. ''जेथे जातो तेथे तू माझा सांगाती.'' अशी परमेश्वर संबंधाची प्रचिती त्याला आली.

सर्वात शेवटी माटे तुकारामाची तुलना आपल्याशी करतात. परमार्थ मार्गात त्याग व निश्चय नसताना पडू नका असा सल्ला तुकाराम महाराजांनी सर्वांना दिला आहे. तुकारामाने ताकीद दिली आहे. 'उभा ऐलथडी। तेणे घेऊ नये उडी।। पुढे गेल्याने उपाय करावे ते केले काय? अशी आमची थोडक्यात अवस्था आहे.

असा हा खडतर अध्यात्मिक मार्ग आचरल्यानंतर तुकारामाला 'आपुल्या माहेरा जाईन मी आता' असे वाटू लागले. हाती शंख,चक्र,गदा,पद्म असे तुकारामाला परममंगलाचे दर्शन झाले. 'तुकारामाने लौकिक अलंकाराने सांगितले,''आता मज वाटे प्राणेश्वरासवे। मी माझिया भावे अनुसरलो।।'' तुझ्याकडे पाहता पाहता मध्येच मागे वळून तो स्वकीयांस म्हणाला,''आम्ही

जातो आपुल्या गावा आमुचा रामराम घ्यावा। आता सरले येणे जाणे। सहज खुंटले बोलणे।।''[४४]
असा कुडीसहित तुकाराम गुप्त झाला.

माटे यांचा संतसाहित्याचा सखोल व्यासंग या निबंधातून जाणवतो. विशेषत: त्यांनी तुकारामाच्या व्यक्तित्वाचा लावलेला अन्वय निश्चितच वेगळा आणि गहिरा आहे. माट्यांच्या प्रतिभेला असलेले संतांचे व संत साहित्याचे आकर्षण या लेखातून स्पष्टपणे लक्षात येते. संत तुकारामाच्या व्यक्तिमत्वातील असामान्यपण माट्यांनी सहजपणे वेधक रीतीने येथे स्पष्ट केले आहे.

-----

## संदर्भ

१) माटे श्री.म.-उपेक्षितांचे अंतरंग.
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. प्रथमावृत्ती १९४१.
अकरावी आवृत्ती १९६३. पुनर्मुद्रण १९९८. पृष्ठ क्रमांक ११.
२) तत्रैव पृष्ठ क्रमांक १९.
३) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०.
४) तत्रैव पृष्ठ क्रमांक १८.
५) तत्रैव पृष्ठ क्रमांक २०-२१.
६) तत्रैव पृष्ठ क्रमांक २३.
७) तत्रैव पृष्ठ क्रमांक २७.
८) तत्रैव पृष्ठ क्रमांक ३०.
९) तत्रैव पृष्ठ क्रमांक २१.
१०)तत्रैव पृष्ठ क्रमांक २६.
११)तत्रैव पृष्ठ क्रमांक ३४.
१२)तत्रैव पृष्ठ क्रमांक ४०.
१३)तत्रैव पृष्ठ क्रमांक ४८.
१४)तत्रैव पृष्ठ क्रमांक ५३.
१५)तत्रैव पृष्ठ क्रमांक ४७.
१६)तत्रैव पृष्ठ क्रमांक ५०.
१७)तत्रैव पृष्ठ क्रमांक ५८.
१८)तत्रैव पृष्ठ क्रमांक ५५-५६.
१९)तत्रैव पृष्ठ क्रमांक ५९.
२०) तत्रैव पृष्ठ क्रमांक ६७-६८.
२१) तत्रैव पृष्ठ क्रमांक ६८-६९.
२२) तत्रैव पृष्ठ क्रमांक ६४.
२३) तत्रैव पृष्ठ क्रमांक ७३.
२४) तत्रैव पृष्ठ क्रमांक ७१.
१५) तत्रैव पृष्ठ क्रमांक ७५.
२६) तत्रैव पृष्ठ क्रमांक ८४.
२७) तत्रैव पृष्ठ क्रमांक ८९.
२८) तत्रैव पृष्ठ क्रमांक ९२.
२९) तत्रैव पृष्ठ क्रमांक ८८.

३०) तत्रैव पृष्ठ क्रमांक ९८-९९.
३१) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०२.
३२) तत्रैव पृष्ठ क्रमांक १००.
३३) तत्रैव पृष्ठ क्रमांक १११.
३४) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०६.
३५) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०५.
३६) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०८.
३७) तत्रैव पृष्ठ क्रमांक १०७.
३८) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३२.
३९) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२५.
४०) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२८.
४१) तत्रैव पृष्ठ क्रमांक १२६.
४२) तत्रैव पृष्ठ क्रमांक १३३.
४३) तत्रैव पृष्ठ क्रमांक १४३-१४४.
४४) तत्रैव पृष्ठ क्रमांक १४६.